मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ

★ रौप्य महोत्सव अंक ★

संपादक
वा. ना. देशपांडे

नोव्हेंबर १९४८] ★ [किंमत १२ आणे

अनुक्रमणिका

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

यु ग वा णी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

★

चुकीची दुरुस्ती:—या खास अंकाच्या पान ३४३ वर गोन्दिया येथे भरणाऱ्या ११ व्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून राजे प्रतापसिंगराव भोसले यांचें नांव चुकून छापले गेलें, त्या ऐवजी श्री. छोटुसा लहानुसा क्षत्रिय असें नांव वाचावें.

ना. कृ. दिवाणजी
सरचिटणीस, वि. सा. संघ

लोकनायक नामदार माधवरावजी अणे



विदर्भ साहित्य संघाच्या रौप्य महोत्सवाचे अध्यक्ष
(१९४८)

डॉ. वि. भि. कोलते



गोंदिया येथील ११ व्या साहित्य संमेलनाचे
अध्यक्ष. (१९४८)

अनुक्रमणिका

जा, पुसा जाउनी !
★

प्रा. पुरुषोत्तम शिवराम रेगे
बी. एस्‌सी. (लंडन)

जा पुसा जाउनि कुणी कुटिल मोहना,
रे उगाच दुष्टा, छळिसी का तूं गरतींना ?

मी परवां होत्यें बदलित साडी जाउन नुकतिच देवाला,
जरा वाकतां अलगद वरती खडा नेमका तों आला.
कुणि मूर्त सावळी होती खाली, शब्दहि कसला हलुच दिला;
सासुरवासिण, खरें सांगतें, मी नाहि मुळी आयकिला !
पण तेव्हापासुन कांहि रुचेना, करमेना ! १

मी काल सकाळीं पाण्या गेलें, सोबतिला नणदा जावा
भर उन्हाची मागे उरलें; हा हाय साधिला दावा !
कुणि मूर्त सावळी वाटेवरती ओठांवर टेकुन पावा
आण गळ्याची, खरें सांगतें, मज कळला नव्हता कावा !
पण तेव्हापासुन कांहि रुचेना, करमेना ! २

मी आज पुन्हा ही अशी एकटी घरांत कातरवेळेला;
दिवाहि नुकता शेजीने तुळशीला होता दाखविला;
ती मूर्त सावळी संकट व्याली, आली, भिडली अंगाला;
आणि विचारी, " चंद्रावलि गे, कुठे कावळा तुज शिवला ? "
मज तेव्हापासुन कांहि सुचेना, समजेना ! ३

अनुक्रमणिका

मित्र जिवाचा

★

सौ. 'पद्मा', बी. ए.

मित्र जिवाचा बकुलतरू हा भाव हृदयींचे ओळखतो
हलवुनि पानें, उधळुनि सुमनें मम जीवाला रंजवितो
या बकुलावर नक्षत्रांसम फुलें उमलती नवलाख
स्वप्नमाळ मी रचितें त्यावर जरि आशा झाल्या शुष्क

जनीं असतांही विजनवास मज गमे जेधवा सौख्यकर
पहात बसतें क्रीडा याच्या नर्म विनोदी खोडकर
वळवाचा पाऊस घरेशीं प्रणयाच्या करि मधु लीला
प्रियजन याचा गमे बकुल हा उत्तेजन दे सखयाला

श्रावणमासीं किति युवतींनी असेल लुटिलें पुष्पधन
रसिकवरें या कौतुक केलें तच्छिरिं सुमनें वर्षून
अवखळ बाळासमान याची मस्ती चाले पवनासी
जणूं घालितो पिंगा चढुनी नशा मस्तकीं कसलीशी

शिशिरागमनीं गळुनी पडतां पर्णभार होउनि पिवळा
विषण्णहृदयें मूकपणें परि सहन करी हा त्याहि कळा
तारुण्याच्या पुनः प्राप्तिची आशा जागृत हृदयांत
शुष्क जाहल्या तरुरायाला जीवन पुरवी दिनरात

सहवासाची सुष्टिसतीच्या ओढ लागतां हृदयाला
सळ सळ याच्या पर्णराशिची प्रतिभा–सदनीं नेइ मला
मूर्तिमंत मग निसर्ग बघतें या बकुलाच्या बहरांत
साठवितें तीं दृश्यें सुंदर तृषित मनाच्या स्वप्नांत

कधीं यावरी बसुनी गाणें उदासवाणें आळवितो
हिरवा पक्षी हुंकाराने निज सजणीला बोलवितो
ऐकुनिया तें करुणगीत स्मृति जागृत हो तरु-हृदयाची
विरहि युव्यासम निशीचि ढाळी सुमराशी निज अश्रूंची

त्या अश्रूंच्या भवतीं माझें मन वेडें गुंगत राही
टप टप पडतीं फुलें पाहतें, तरि न स्पर्शतें त्या कधि ही
मृदुल सावळ्या या कुसुमांची माला स्वकरें गुंफियली
निज आशांची फुलांमधें त्या नकळत गुंफण मी केली

याच तरूला ठेवुनि साक्षी माला दिधली सुहृदाला
सुकली तरिही चिरसौरभयुत राहिल गमलें हृदयाला
बकुल उधळितो अखंड परिमल आणि विद्ध हो मी हृदयीं
माला सुकली नवल न मम; परि सुगंधही उडुनी जाई !

●

' सुरलोक मेघ ' *

कॅप्टन डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे,
एम्. बी. बी. एस.

(वृत्त उपजाति)

ऐशी खुणा वागवुनी मनांत द्वारीं तसे बाजुस शंख, पद्म,
चितारलेले चतुरा ! बघोनी तूं शोधुनी काढ मदीय सद्म
माझ्या वियोगें जणु कांति त्याची आता परिम्लान असेल खास;
सूर्यास्त होतां कमल स्वशोभा खरोखरीं ना धरितें विशेष ! १

खाली रिघाया आणिं शीघ्रतेने लहान तूं हो करिंणोतसाच
क्रीडागिरी मी वदलों, तयाच्या तूं रम्य सानूवरि बैस उंच
तेथूनि तूं दृष्टि तुझी विजेची करूनिया सौम्य अतीव ऐशी–
खद्योतपंक्तिद्युतिशीच, तीतें मन्मंदिराअंतरिं रे ! निवेशीं २

मनोज्ञगात्री सुदती, कृशांगी, बिंबाधरा, सुंदरमध्य नारी
गंभीरनाभी मृगशावनेत्रा, नितंबभारें हळु चालणारी,
किंचिन्नता जी कुचकोरकांनी–गमेल लावण्य असें बघोनी
जणो विधात्याकरिंची असे ती अनन्य सृष्टी रमणीविधानीं ३

तूं जाण ती रे ! मित बोलणारी, माझें जणों जीवित दूसरें की,
मी दूर होतां सहचारि, राही एकाकिनी जी जणु चक्रवाकी
उत्कंठ जी होउनि कंठिताहे वियोगदीर्घा दिवसां अशा या
हिमार्दिता ती जणु पद्मिनीच प्रणष्टशोभा मम होय जाया ! ४

अती रडोनी सुजले असावे डोळे प्रियेचे मज खास भासे
असेल गेली अधरोष्ठ-कांती टाकोनिया उष्ण असे उसासे
हातावरी टेकियल्या मुखाची भा लोंबत्या केशिं कशी दिसावी !–
तूं लागतां पाठिशि इंदुची जी व्हावी दशा तन्मुख तीच दावी ! ५

पडेल ती दृष्टि तुझ्या क्षणींच पूजेंत जी गुंगलि भक्तिभावें
किंवा, चितारी निजकल्पनेने मी जो वियोगें कृशतेसि पावें;
किंवा, असे पंजरिं सारिका जी, विचारिते त्या मधुभाषिणीसी—
' येथे स्मृती का रसिके ! धन्याची ? की त्यासि तूं आवडतीच होती ! ६

---

१. कोल्हापूरचे कवि डॉ. श्रीखंडे यांनी ' मेघदूता ' चा उत्कृष्ट अनुवाद केला आहे, त्यांतील हा उतारा आहे.

त्याल्या सुवस्त्रा मलिनत्व आलें, ऐशी निजांकावरि घेई वीणा,
माझ्यावरूनी रचिल्या पदाच्या जो लागये ती करुं गोड गाना,
तो अश्रुपातें भिजतात तारा, कशी तरी त्यांसि पुसोनि घेती
आलाप, ताना, रचिल्या स्वताही, पुनः पुन्हा त्या विसरे तरी ती ! ७

कीं उंबऱ्याच्या वरि पुष्पपुंज स्थापूनि जी मोजुनि पाहणारी
शापावधीचे किति मास शेष अजूनि नेणें विरहार्तिपूरीं;—
की कल्पनेनेच हृदीं, मदीय समागमाचें सुख चाखणारी
घना ! अशा चित्तविनोदनांनी प्रायां वियोग क्रमतात नारी ! ८

कार्यांत ती मग्न दिसां असे तै व्यथा न तेवी तिज मद्वियोगें,
गमे सखी ती तव तीव्रदुःखी रात्रौ रिकामेपणिं होऊं लागे;
तूं राहुनी सौधगवाक्षि मेघा ! विनिद्र त्या भूतलशायिनीसी
संदेश माझे कथुनी सतीसी – पहा कराया तिज मग्न हर्षीं

चिंताकृशा टेकुनि एक बाजू वियोगशय्येवरि राहिलेली
कला शशीची जणु एक शेषा पूर्वाद्रिभागावरि होय ठेली;—
जी रात्र नेली क्षणशीच तीने मत्संगतीं रंगुनि इष्टभोगीं
ती तीच आता विरहार्तिदीर्घा उष्णाश्रुंनी कंठित कोमलांगी ! १०

गवाक्षमार्गें शशिपाद येती जे शीतलस्पर्श सुधेसमान
पूर्वींचिया आवडिनेच त्यांतें गेलें परी जें परतोंचे तूर्ण
दुःखाश्रुयोगें जड जाहलेल्या जी पांपण्यांनी निजनेत्र झाकी
भूपद्मिनीं ती जणु दुर्दिनींची विकासली ना, मिटली न बाकी ! ११

ओष्ठाचिया कोमल पल्लवासी निःश्वास जे पीडिति, हालवीती—
स्नानें अतैलें अतिरूक्ष केशां, जे की कपोलांवरि लोंबताती
स्वप्नीं तरी केवि मिळेल माझा संयोग या साठिंच इच्छिणारी
निद्रेसि-जी व्यापुनि टाकणाऱ्या निरोधियेली विरहाश्रुपूरीं १२

वियोग होतां पहिल्या दिनीच माळेविना गुंफिली होय वेणी
शापावसानीं सुटतांचि शोक सोडायचें मीच जिला फिरोनी
गाठाळली, गुंतलि, एकपेडी जी स्पर्शणेंही बहुदुःख होणें—
कपोलभागांवरुनी कितीदा जी सारि अच्छिन्ननखें करानें ! १३

विभूषणांना अबला धरीते, दुःखाकुला जाहलिसे कृशांगी
शय्येवरी लोटि पुनः पुन्हा जी तनू निजा पोळियली वियोगीं
पाहूनि ती निश्चित ढाळशील तूं अश्रुधारा नव वारिरूपीं
प्रायां जयां अंतरिं आर्द्र आत्मा – कारुण्य त्यांचें न लपे कदापि ! १४

जाणें सखीचें तव चित्त माझ्या ठायीं किती प्रेम धरूनि राहे
म्हणोनि माझ्या पहिल्या वियोगीं अशी असे हा मम तर्क वाहे
दैवी खरा मी अभिमान ऐसा माझ्या मुखीं वा वदवी बढाई—
जें वर्णिलें मी, तुज तें दिसेल प्रत्यक्ष बंधो ! न विलंब कांही ! १५

केशांमुळे वाव न यत्कटाक्षां, न स्निग्धसें काजळ ज्यांत त्यालें,
त्यागें तसें जें मधुसेवनाच्या भ्रूभंगलीला विसरूनि गेलें !
तूं पावतां, त्या मृगलोचनेचें स्फुरोनि तें नेत्र वरी धरील
शोभा जशी क्षोभुनि मीन, तेणें विकंपणारें धरि अब्ज नील ! १६

डावा तसा ऊरू तिचा, मदीय नखक्षतें ज्यावरि नैव होतीं,
मुक्तावली नित्याचि घालणेची जयासि ना संप्रति घातली ती–
हस्तेंहि व्हावा रगडावयातें जो योग्य मातें सुरतश्रमान्तीं
रम्भार्द्रगाभा जणु केळिचा जो, पावेल तो कंपन गौरकांति ! १७

त्या कालिं मेघा ! जर आढळेल निद्रासुखीं मग्न सखी त्वदीया
तुवां करावी प्रहर प्रतीक्षा न गर्जतां, बाजुसि बैसुनीया,
कसा तरी स्वप्निं तिला मिळालों प्रेमी तिचा मी असतां रमाया,
न हो अकस्मात् भुजवल्लरींची कंठीं मिठी गाढ सुटोनि वाया ! १८

जागी करोनी तिजला स्वताच्या तुषारयोगें सुखशीत वातें
प्रफुल्लता द्याविस मालतींच्या नव्या कळ्यांचे सह तूं तियेतें;
बघेल विद्युत्सह बैसलेल्या तुला गवाक्षीं चकिताक्ष जी की,
स्वगर्जितांच्या वचनीं सुधीरा ! त्या मानिनीसी वदण्यास ठाकी ! १९

“ मी मेघ, जीवत्पतिके ! असें हा त्वद्वल्लभाचा प्रियमित्र जाण–
आलों तुझ्यासन्निध, हृत्पुटांत संदेश त्याने दिधले धरून
प्रवासिवृंदा पथिं थांबणाऱ्या, गंभीरनादें त्वरवीत जो की
सोडावया वेणि निजांगनांच्या करीं समुत्कंठित मी, विलोकी ! ” २०

हें सांगतां तूं तिजलागि ती ही औत्सुक्ययोगें हृदयीं फुलून
अत्यादरें वायुसुतासि सीता बघेल तैसी उचलोनि मान
ऐकेल ती लावुनि लक्ष्य साधो ! पुढेंहि जें तूं वदशील तीतें;
सुवृत्त मित्राकरवी पतीचें सतींप्रती संगमकल्प होतें ! २१

पानझड

यी. रघुनाथ

पानझडी ! पानझडी !
सुरूं जाहल्या पानझडी !
हुडहुडींत हीं उसनीं विभवें
प्राणहीन पडतिल उघडीं ! १

नटमोहर वटराज जटिल कुणि
बसोत आकाशीं टक लावुनि
घातकाची अदळता एक ती
झडप क्षणीं पाडिल उपडी ! २

विविध घनांच्या राखुनि सेना
होते कोणी करित गर्जना
वातचक्र दिसलें न तोंवरी,
आता घेतील कुठे दडी ! ३

पुटें हिमांची झटकुन उठलीं
चहूकडुन एकच मंडाळी
कुसळें ज्यांनी पायिं चिरडिले
त्यांची आली अता घडी ! ४

चिरतिल चिरं द्या गळे कुणाचे
जळतिल जळुं द्या मळे कुणाचे
वसंत नाही विना सोडल्या
रोखतील जे वाट, घडी ! ५

कोठला जादुगार हा तरी ?

प्रा. ' विरागी, ' एम्. ए.

मनीं माधुरी भरी,
कोठला जादुगार हा तरी ! ध्रु०

मारुतलहरींतुनी स्पर्शुनी
तनु रोमांचित करी—
कोठला जादुगार हा तरी ! १

सुगंध अनुपम अविरत विखरी
मदीय हृदयान्तरीं—
कोठला जादुगार हा तरी ? २

तिमिरीं दावी प्रकाश, बाही
मंजु अस्फुट स्वरीं—
कोठला जादुगार हा तरी ! ३

वेधी मजला अयस्कांतसम
बहु ओढी निज करीं—
कोठला जादुगार हा तरी ? ४

तयाकडे मी जाइं, प्रेमें
येई मजकडे परी—
कोठला जादुगार हा तरी ! ५

क्षणिं हृदयाचें द्वार खोलुनी
बसे आसनावरी—
कोठला जादुगार हा तरी ? ६

प्राणसखा जो गमे, अर्पिले
प्राण जया झडकरी—
कोठला जादुगार हा तरी ! ७

विदर्भ-साहित्य-संघाचा रौप्य महोत्सव

★ वा. ना. देशपांडे

'युगवाणी' मासिक विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र म्हणून जानेवारी १९४६ पासून निघत आहे, हें त्या नियतकालिकाच्या वाचकांस नव्याने सांगावयास नको. विदर्भ-साहित्य संघाचा रौप्य-महोत्सव चालू वर्षी साजरा करण्यांत येत आहे, त्या निमित्ताने हे दोन प्रासंगिक शब्द मी लिहीत आहें.

विदर्भ-साहित्य संघ ही संस्था १९२३ मध्ये उमरावती येथे स्थापन करण्यांत आली. तिच्या स्थापनेचें श्रेय सर्वस्वीं कविभूषण प्रा. बळवंत गणेश खापर्डे यांजकडे जातें. विदर्भप्रांत राजकीय दृष्ट्या पश्चिम महाराष्ट्रापासून अलग झालेला होता. विदर्भांत इंग्रजी शिक्षणास उशिरा सुरवात झाल्यामुळे त्याजवर मागासलेपणाचा आळ आलेला होता. अर्थात् वाङ्मयदृष्ट्या विदर्भाच्या गरजा, पश्चिम महाराष्ट्राच्या गरजांपेक्षा, पुष्कळच निराळ्या होत्या, हें उघड आहे. यामुळे महाराष्ट्र-साहित्य-परिषद् किंवा महाराष्ट्र-साहित्य-संमेलन कार्यप्रवण असतांहि विदर्भांत वाङ्मयीन प्रगति होण्यासाठी स्वतंत्र संस्थेची आवश्यकता होती व कांही प्रमाणांत ती अजूनहि आहे. हें लक्ष्यांत घेऊनच प्रा. खापर्डे यांनी विदर्भ-साहित्य-संघाची कल्पना काढली व ती अनेक वाङ्मयप्रेमी मित्रांच्या मदतीने सत्यसृष्टींत अंमलांतहि आणली. या उठावणींत 'सवत्या सुभ्या' चा अगर दुसरा कसलाच हीन हेतु नव्हता व नाही, याची खातरजमा विदर्भाबाहेरच्या साहित्यभक्तांनी बाळगण्यास हवी.

विदर्भ-साहित्य-संघाच्या जन्माचा व बाल्यावस्थेचा सविस्तर वृत्तांत त्याचे संस्थापक प्रा. खापर्डे यांनी याच अंकांत प्रसिद्ध होत असलेल्या आपल्या लेखांत सविस्तर दिलेला आहे. त्याची पुनरुक्ति येथे करण्याचें कारण नाही. त्याचप्रमाणें, विदर्भ-साहित्य-संघाच्या कार्याचा आढावा घेणारा 'विदर्भ-साहित्य-संघ' या शीर्षकाचा एक लेख प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी 'युगवाणी' च्या पहिल्या—म्हणजे जानेवारी १९४६ च्या—अंकांत लिहिलेला आहे. तोहि जिज्ञासूंनी अवश्य पाहावा. त्यांतील माहितीचीसुद्धा या ठिकाणीं पुनरुक्ति करण्याचें प्रयोजन नाही.

विदर्भ-साहित्य-संघ १९२३ मध्ये स्थापन झाला, याचा अर्थ १९४८ मध्ये त्याला पंचविसावें वर्ष लागलें, असा होतो. या पंचवीस वर्षांत वस्तुतः संघाची पंचवीस अधिवेशनें व्हावयाचीं. परंतु प्रत्यक्ष अधिवेशनें दहाच झालीं! चालू म्हणजे अकरावें अधिवेशन गोंदिया येथे नोव्हेंबरमध्ये भरत आहे. दरसाल संमेलनें न भरण्याचीं कारणें अनेक होतीं. त्यांचा उच्चार येथे करण्यांत अर्थ नाही. इतकें म्हटलें म्हणजे पुरें की, या 'शैथिल्या'चा दोष विदर्भ-साहित्य संघाच्या त्या त्या वेळच्या कार्यकारी पदाधिकाऱ्यांकडेच केवळ जात नाही, तर तो तुम्हां-आम्हां सर्वच विदर्भीयांकडे जातो! त्या त्या वेळच्या पदाधिकाऱ्यांना दोष लावून जबाबदारींतून निसटून जाण्याची तुम्हां-आम्हां सर्वसाधारण लोकांची प्रवृत्ति असते. पण ती खासच अयोग्य आहे! पदाधिकारी 'चुकार' म्हणून क्षणभर गृहीत धरलें, तथापि कार्याची धुरा तुम्हा-आम्हाला वाहण्यास कुणी 'नको' म्हटलें होतें की काय!–सांगण्याचा मुद्दा हा की, याबाबत एकाने दुसऱ्यास दोष देण्यांत तादृश उपयोग नाही. आपण सारेच दोषी आहोंत, एवढें कबूल करावयास हरकत नाही, आतापर्यंतच्या अधिवेशनांची सविस्तर वार्ता वि. सा. संघाचे सध्याचे सरचिटणीस प्रा. ना.कृ. दिवाणजी यांच्या अहवालांत इतरत्र देण्यांत आलीच आहे.

अधिवेशनांशिवाय विदर्भ साहित्य-संघाचीं अलीकडील महत्त्वाचीं स्वीकृत कार्यें दोन: पहिलें कार्य 'युगवाणी' मासिकाचें व दुसरें संघाच्या परीक्षांचें. 'युगवाणी' मासिक १९४६ मध्ये वि. सा. संघाने आपल्या खर्चानें चालविलें. १९४७पासून पुढील पांच वर्षे त्याचें प्रकाशन अमरावतीचे श्री.द.ना. ठाकूर यांनी व संपादन प्रस्तुत लेखनाने करावयाचें ठरलें आहे. त्याप्रमाणें व्यवस्था सुरू आहे. संघाच्या चार परीक्षा ठेवण्यांत आल्या असून त्यांचीं नांवें 'साहित्यविनीत', 'साहित्यपरिचित', 'साहित्यस्नातक' व 'साहित्यपारंगत'–अशीं आहेत. परीक्षा उत्तरोत्तर लोकप्रिय होत आहेत, ही समाधानाची गोष्ट होय. या परीक्षा महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या परीक्षांशी स्पर्धा करण्यासाठी काढण्यांत आल्या, अशी टीका मुंबई–पुण्याकडील मित्रांनी मध्यंतरी केली होती! परंतु या परीक्षा स्पर्धेसाठी काढलेल्या नसून केवळ कांहीं व्यावहारिक सोयींच्या दृष्टीनेच काढलेल्या आहेत, हें संघाचे कार्यकर्ते तरी खचित जाणतात. या परीक्षांना लावलेल्या पुस्तकांत मुंबई–पुण्याकडील लेखकांचीं पुस्तकें आहेतच. खेरीज, वऱ्हाड–मध्यप्रांतांत ज्याप्रमाणें महाराष्ट्र साहित्य-परिषदेच्या परीक्षा होतात, त्याप्रमाणें मुंबई–पुण्याकडेसुद्धा विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षा होण्यास संघाच्या कार्यकर्त्यांकडून काहीच हरकत नाही! तेव्हा 'सवत्या सुभ्या'चा प्रश्नच कुठे उरला?

'युगवाणी' मासिकांत तर विदर्भीय साहित्यिकांप्रमाणेंच विदर्भाबाहेरच्या साहित्यिकांचेहि लेख वगैरे येत असतात; आणि, पूर्वोक्त साहित्यिकांप्रमाणें उत्तरोक्त

साहित्यिकांचा देखील परिचय—वगैरेंच्या रूपाने समुचित परामर्ष घेण्यांत येत असतो. ' युगवाणी ' मासिक हें प्रांतीयता व जातीयता या दोन्ही दोषांपासून सर्वथैव अलिप्त आहे, असा त्याचा स्वयंस्फूर्तीने गौरव करणारीं किती तरी पत्रें मजकडे आलेलीं आहेत ! —अशा पत्रांमुळेहि-' सवत्या सुभ्या 'च्या आरोपाचें परस्पर खंडन होत आहे !

विदर्भ-साहित्य-संघाचा १९२९ ते १९३६ व १९३८ ते १९४४ हा कालखंड ' तमोयुगा 'चा म्हणावयास पाहिजे ! परंतु १९४५ मध्ये संघाचें जें पुनरुज्जीवन झालें, त्यामुळे तो पुन: जोमाने वाढीस लागला आहे. चालू सालच्या रौप्य—महोत्सवाने तर संघाच्या शरीरांत विशेषच तरतरी आल्यासारखी दिसत आहे ! यापुढे संघाचीं सारीं कामें उत्साहाने व नियमितपणाने पार पडतील अशी आशा याप्रसंगीं आपण बाळगूं या.

विदर्भ—साहित्य—संघाला अजून पुष्कळच गोष्टी करावयाच्या आहेत, याचाहि आपणांस विसर पडतां कामा नये. कोणत्याहि संस्थेला स्थैर्य येण्यास तिजजवळ कायमनिधि असावयास पाहिजे व तिची स्वत:ची इमारतहि असावयास पाहिजे. तसेंच वि. सा. संघासारख्या साहित्यविषयास वाहिलेल्या संस्थेचा स्वत:चा छापखाना नसणें ही मोठीच अडचण आहे ! —या सर्व ' कल्पना ' सत्यसृष्टींत उतरावयाच्या, तर कांही निष्ठावंत कार्यकर्त्यांनी या कार्यास आपल्याला वाहून घ्यावयास पाहिजे. असे कार्यकर्ते अहमहमिकेने पुढे येवोत व विदर्भ—साहित्य—संघाचा सुवर्ण—महोत्सवहि योग्य वेळीं साजरा करण्याचा सुप्रसंग येवो, हीच या वेळेस मनोमन इच्छा आहे.

बाळशास्त्री जांभेकर

कै. केशव शिवराम भवाळकर

[संग्राहक—डॉ. य. खु. देशपांडे, एम्. ए., एल्.एल्. बी., डी.लिट् .]

● नागपूरचे प्रसिद्ध साहित्यिक कै. नी. ब. भवाळकर यांचे आजे कै. केशव शिवराम भवाळकर (१८३१–१९०२) यांनी १८९४ मध्ये अपूर्ण आत्मचरित्र लिहिलें, तें अजून अप्रसिद्ध आहे. कै. केशवराव भवाळकर हे विख्यात ग्रंथकार, वृत्तपत्रकार व पट्टीचे विद्वान् कै. बाळशास्त्री जांभेकर यांचे विद्यार्थी होते. या भवाळकरांचा उल्लेख दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रांत आहे. भवाळकरांच्या आत्मचरित्रांत बाळशास्त्री यांजसंबंधीं कांही मजकूर आलेला आहे, त्यांतून शास्त्रीबोवांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश पाडणारे व मनोरंजक असे उतारे पुढे दिले आहेत. सदर आत्मचरित्र डॉ. य. खु. देशपांडे यांच्या संग्रहीं असून त्यांच्याच कृपेने हे उतारे देण्यांत येत आहेत.

बाळशास्त्री जांभेकर १८४६ मध्ये, म्हणजे एकशें दोन वर्षांपूर्वी, वारले. त्यांचें बा. ना. देवकृत छोटें चरित्र उपलब्ध असून त्यांजवर कित्येक लेख लिहिले गेले आहेत. पण त्यांचें अधिकृत व विस्तृत चरित्र अद्यापि लिहिलें जावयाचें आहे. त्या दृष्टीने त्यांच्याबद्दलचे पुढील उतारे उद्बोधक वाटतील, असें वाटतें.

मूळांतील भाषापद्धति कायम ठेवली आहे.

शास्त्रीबाबा हे शिमग्याचे सुटींत कान्हेरी येथे गुहा पाहाण्यास व तेथील शिलालेख पाहाण्यास गेले होते. त्यांला तेथे जंगली ताप लागला. ते परत आले. परंतु तो विकार त्यांचे अंगीं राहिला होता. त्यांचे तोंडांतून कधी कधी रक्त पडत असे. तरी ते दुखणें रेटून कामावर येत असत. आपल्यास आजार आहे, असें ते दाखवीत नसत. त्यांचा नित्य व्यासंगक्रम जारीच असे. पुढे मे महिन्याची सुटी आली. आम्ही सर्व विद्यार्थी आपापले घरीं गेलों होतों. शास्त्रीबाबा कणकेश्वर, कुलाबा जिल्ह्यांत आहे, तेथे हवा बदलण्यास गेले होते. तेथे त्यांला तापाने पछाडलें. ते मुंबईस आल्यावर त्यांला बरें होण्याचे उपाय डॉक्टर मारेहड, ग्रॅंट मेडिकल कॉलेजचे प्रिंसिपॉल, आणि इतर विद्वान् मुंबईचे प्रख्यात डॉक्टर यांनी केले. परंतु

संनिपाताच्या ज्वरानें त्यांस देवआज्ञा झाली ! सर एस्कीन पेरीसाहेब, सुप्रीम कोर्टाचे जज्ज, यांचे शास्त्रीबावांवर फारच प्रेम होतें. त्यांची विद्वत्ता व बुद्धिमत्ता व आचरण हें पाहून सर्व साहेबलोक व विद्वान् नेटीव लोक त्यांस मोठे चाहत असत व सन्मान देत असत.

शास्त्रीबावांचे मागें त्यांस एक सुमारे दोन वर्षांचा मुलगा होता व कुटुंब गरोदर असून प्रसूतसमय हा समीप होता. पेरीसाहेब हे बोर्डाचे प्रेसिडेंट होते. त्यांनी ईस्ट-इंडिया-कंपनी सरकारास शास्त्रीबावांचे विषयीं लिहून त्यांचें मागे त्यांच्या कुटुंबास दरमहा रु. ५० व चिरंजीवास रु. २५ व दुसरा चिरंजीव, नुकताच जन्मला, त्याला रु. २५ याप्रमाणें पेनशन तहाहयात देयावें, म्हणून शिफारस केली. ती मंजूर होऊन आली. परंतु त्या नेमणुकीचा अनुभव फारच थोडे दिवस त्यांनी अनुभाविली ! बिचारी त्या माउलीने व तिच्या धाकट्या मुलांनी थोडे महिन्यांतच देहत्याग केला व थोरला मुलगा तोहि त्याच नंतर मरण पावला ! शास्त्रीबावांची इस्टेट, घर व कांहीं थोडी, होती ती त्यांचा पुतण्या, गजाजनशास्त्री होता, त्यांला मिळाली. परंतु तोहि मरण पावला !

शास्त्रीबावाचें विशेष चरित्र माझ्याने लिहिणें अशक्य होय. कारण शास्त्रीबावांच्या सहवासाचा लाभ मला व माझे सहाध्यायी यांजला काय तो पुरा १ वर्षहि झाला नव्हता. शास्त्रीबावांचें स्वरूपः उंची मध्यम, वर्ण काळा, अंगांत लपळाई, चेहरा तेजदार व हास्तमुख असे. पोषाक कांहीसा गृहस्थी व कांहीसा शास्त्री-दर्शीचा असे ! लाल पागोटें पुणेरी बांधणीचें मोठें, अंगरखें सफेत कापड्याचें ब्राह्मणी थाटाचें पेलेदार परंतु पोकळ व गुडघ्याचे खालपावेतों, अंगरख्याचे आतून पांढरी बारबंदी व कधी आंतून फ्लानेलची बंडी व नेसण्याचें रेशीमकाठी मोठें काठाचें धोतर व अंगावर कधी अंगवस्त्र रेशीमकाठी मोठें काठाचें, कधी पांढरा शेला, कधी शालजोडी लाल लाखी रंगाची, पायांत चर्मी जोडा दक्षणी, कपाळीं उभें पांढरें गंध व मध्ये लाल अक्षत किंवा टिका असावयाचा. शास्त्रीबावांचे डोळे तेजदार असत. त्यांची मुख-मुद्रा पाहतां, जणू त्या चेहऱ्यावर सरस्वती देवीने विद्येचें तेजच भरून टाकलें आहे काय ! त्यांचे पायास इसाब होते. याकरितां ते बहुत-करून पायमोजे घालीत असत. परंतु जोडा चर्मी दक्षिणीच असे. त्यांना कधीहि बूट घालतांना पाहिलें नाही. त्यांचे दात अधू असत. त्यांना पान, तंबाखु किंवा तपकीर कोणतेंहि व्यसन नसे. त्यांना पाहून सर्व शाळेंतील गुरु व विद्यार्थी फार बचकत असत व त्यांचा दरारा सर्व मानीत. कारण विद्येचे तेज आणि आचरणाचा जोरही दिसत होती.

त्यांचे नित्याचे वेळ बांधले असत. मोठ्या पहाटेस उठून शौच मुखमार्जन करावयाचें व ओटीवर किंवा माडीवर सुमारें अर्धा तास घरची गंझळी किंवा

इतरांशी बोलाचाल करावयाची. सुमारें सात वाजल्यावर आपले खोलींत जाऊन, पुस्तकें, दार लावून घेऊन वाचावयाचीं. ९ वाजले कीं, खोलींतून बाहेर येऊन माडीवरून खालीं जाऊन स्नानाला बसावयाचें. तें झालें की धोतर नेसून संध्या करावयाची व नमस्कार घालावयाचे. तें झालें की, भोजनास बसावयाचें. पंक्तीस भोजनार्थ १०।१२ मंडळी असावयाची. त्यावेळीं भोजनभाऊंनी काय बोलावयाचें असेल, तें बोलावयाचें. भोजन झालें की, हात धुतले की, एक विडा पानाचा त्यांला देत. तो चावून रस घेतला की, विडा थुंकून गुळणा करून माडीवर जाऊन पोषाक करावयाचा. इकडे शिग्राम तयार असावयाचा. त्यांत पुस्तकें घेण्याचीं तीं ठेवून शाळेंत जावयाचें. तेथे ११ वाजतां शाळा सुरूं होतांच वर्गांत नेमलेले विषय नेमलेले वेळीं शिकवावयाचे. मधे १॥ वाजल्यावर अर्धा तास सुटी होत असे. त्या वेळांत आणि २ वाजल्यापासून ४ वाजेपर्यंत गणिताचीं उदाहरणें सोडविण्यासाठी दिल्यास तितक्या वेळांत एल्फिन्स्टनचा हिंदुस्थानचें इतिहासानें भाषांतर करावें आणि ४ वाजल्यापासून ५ वाजेपर्यंत इंग्रजी भाषेचे नियम शिकवावें. ५ वाजल्यावर सुटी झाली की, शास्त्रीबावांनी लैब्ररी, एल्फिन्स्टन स्कूलची, त्यांत जाऊन पुस्तक वाचीत दिसेनासें झालें तोंपावेतों बसावें. नंतर घरीं जावें. तेथे गेल्यावर पोषाक उतरला की, अंगवस्त्र अंगावर असे, किंवा नसे, पुढील माडीचे खिडकींत बसावें. भोजनाची तयारी झाली की, हातपाय धुवून मधे आडवस्त्र रेशमी मुकटा घेऊन पूतवस्त्र पंचा साधा नेसून संध्या करावी व भोजन करावें. भोजनपंक्ती असावयाची व कांही गोष्टी त्यांच्या चालावयाच्या. भोजन झालें की, माडीवर जाऊन पुढील दिवाणखान्यांत बसावें. तेथे त्यांचा चुलतभाऊ गोपाळशास्त्री नांवाचा होता, त्यानें वीणा घेऊन पंचपदी म्हणावयाची व त्याबरोबर त्यांचे घरांत बिऱ्हाडाने राहणारे नाना गानु व गणपतराव गानु व आणखी कोणी मंडळी बसावयाची. शास्त्रीबावांनीहि पंचपद्या म्हणावयाच्या. तें झालें की, सुमारें ९ वाजतां शास्त्रीबावा आपले खोलींत निजावयासाठी म्हणून जावयाचे, ते ११ वाजत पावेतों पुस्तकांचें वाचन करीत. नंतर निजावयाचें, तें पहाटेचे ४ वाजल्यावर उठून पुस्तकें उजाडे-पर्यंत वाचीत असत. हा त्यांचा नित्यक्रम होता. ह्यांत प्रायः अंतर पडलेलें मला स्मरत नाही.

शास्त्रीबावांचे घरीं कोकणचे पाहुण्यांचा फार सुळसुळाट असे व कोणालाहि आपलें घरीं राहूं नको, असें कदापि त्यांनी म्हणूं नये व तेहि यथेच्छ राहत असत. त्यामुळे त्यांची मोठी प्राप्तीहि पुरण्याची पंचाईत असे! शास्त्रीबावांस मरणसमयीं कांही हजार कर्ज होतें! त्याबद्दल दोन कारणें होतीं एक तर, पाहुण्यांच्या संबंधाने आदापेक्षा खर्च जास्ती, मुंबई वस्तींतला (खर्च) तो! आणि, श्रीपत शेषाद्रि यांचे संबंधाने भट-भिक्षुकांस दक्षिणा देणें, पुण्यास जाणें-येणें, तेथे सभा

 करवून दक्षिणा देणे-यांमुळे कर्ज त्यांला झालें होतें. बाकी, त्यांचा...खर्च फार

नियमित व बेताबेताचा होता. त्यांचे पदरचे व आश्रीत हेहि प्रामाणिकपणें त्यांचे प्रपंचाचा कारभार पाहत नसत, अशी ओरड ऐकूं येत असे. त्यांचे कुटुंबावर दागिनेहि विशेष किंमतीचे नसून साधारण व थोडेच असत.

शास्त्रीबावांनी प्रथमतः मुंबईस वर्तमानपत्र ' दर्पण ' नांवाचें काढलें होतें. यांत इंग्रजी भाषेंत लेख व वर्तमानें शास्त्रीबावांनी व मराठी भाषेंत गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ महाजन लिहीत असत. तें वर्तमानपत्र थोडीं वर्षे चाललें होतें. परंतु लैबल केस त्यावर होऊन तें नष्ट झालें! त्यावर भाऊ महाजन ह्यांनी शिळा छापखाना काढून ' प्रभाकर ' नांवाचें मराठी वर्तमानपत्र काढिलें होतें. तें पुष्कळ वर्षे चाललें. खेड्यापाड्यांतून त्यावेळीं वर्तमानपत्रास ' दर्पण ' म्हणण्याचा परिपाठ असे! व त्यांत बातम्या खऱ्या नसतात, असाहि त्यावेळीं लोकांचा समज असे! शास्त्रीबावांनी मराठींत ग्रंथ केले. त्यांचीं नांवें मला स्मरतात, तीं येणें प्रमाणें:— लिपीधारा, नीतिबोध कथा, भूगोल, बाळव्याकरण, इंग्लंडची बखर, हिंदुस्थानचा इतिहास, बाळ व्याकरण हें शास्त्रीबावांचें प्रथम पुस्तक होय...

शास्त्रीबावांनी ' विद्यार्थैनमः ' म्हटल्यावर श्रावणीचा दिवस आला, तेव्हा आम्हा सर्व विद्यार्थ्यांस श्रावणीस आपले समागमें घेतलें व सर्वांस भोजन दिलें. त्यावेळीं पुरणपोळ्या व त्याला नारळाचें दूध भोजनास होतें. मला तो पहिला प्रसंग पाहून आनंद झाला. कारण नारळाचें दूध काढतात व खातात, हें मला त्या दिवशीं समजलें! आता जर्मनींत त्यांतून लोणी काढून युरोप–अमेरिका येथे लोण्या ऐवजीं उपयोग करूं लागले आहेत. श्रावणीचे दिवशीं भाऊ महाजन यांजला शास्त्रीबावांनी बोलाविलें होतें, परंतु लौकर आले नव्हते. सर्व तटस्थ बसले होते! शास्त्रीबावांचे आग्रह व मुहूर्त म्हणूनच आले. शास्त्रीबावा विनोदाने त्यांचे पश्चात् म्हणाले होते की, " भाऊंला वळविणें मोठें कठीण काम आहे! ते येतीलच, निश्चयानें सांगणें अशक्य आहे!"–पुढे दसऱ्याचे दिवशीं आम्हांस तसेंच भोजन येतें (?) दोन दिवस बाळकेश्वरीं आपण सर्व आम्हांस घेऊन अभ्यंगस्नान व लाडू वगैरे पक्वान्नांचें यथेच्छ भोजन दिलें. तोच शेवटाचा त्यांचा पंक्तिलाभ व प्रसाद मिळाला! शिमग्याचा सण ते विशेषतः करीत नव्हते. सायंकाळी होळीची पूजा गोपाळशास्त्री यांनी केली व शास्त्रीबावांनी होळीभोवती प्रदक्षिणा करून एक शंखध्वनी लहानसा केला! व आम्हा सर्वांस नारळाचे खोबऱ्याचा प्रसाद मिळाला! दिवाळींत सायंकाळी.........समुद्रावर हवा खाण्यासाठी शास्त्रीबावा आम्हा विद्यार्थ्यांस समागमें घेऊन गेले होते. तेव्हा समुद्राविषयीं, त्याची भरती-ओहोटी; त्यावर चंद्रसूर्यांचें आकर्षण व विस्तार यांवर व नौकाशास्त्रावर व त्यांचें गमन मान व होकायंत्राचा उपयोग वगैरे विषयांवर बोलले. कोणी शंका घेतल्या, त्यांचे समाधान करीत.

●

विदर्भ साहित्य संघाची जन्मकथा व बाल्यकाल

कविभूषण–प्रा. बळवंत गणेश खापर्डे.

● विदर्भ-साहित्य-संघाचे संस्थापक व आद्य सरचिटणीस कविभूषण प्रा. ब. ग. खापर्डे यांनी संघाच्या जन्माचा व बाल्यावस्थेचा वृत्तांत अतिशय चटकदार रीतीने या लेखांत दिलेला आहे.

"युगवाणी"च्या संपादकांनी दोनतीन पत्रें लिहून आग्रह केल्यामुळे मी हा लेख लिहित आहें. नाहीं तर, तो प्रस्तुत परिस्थितींत लिहिण्याचें धैर्य मला झालें नसतें. कारण, मी हा लेख काशीस हिंदुविश्वविद्यालयांत बसून लिहीत आहें. येथे माझ्याजवळ माझ्या जुन्या दैनंदिन्या, संघाचे कोणतेहि कागदपत्र किंवा कांहीही टांचणें नाहीत ! अशा स्थितींत निव्वळ स्मरणशक्तीवरच विसंबून राहून मला तो लिहावा लागणार आहे ! आणि मला वीस पंचवीस वर्षांपूर्वीच्या गोष्टी सांगावयाच्या आहेत ! म्हणून तो आठवणींच्या रूपाने तुटक तुटक लिहिणें भाग आहे व त्यांत कांहीं दोषहि राहून जाण्याचा पुष्कळ संभव आहे.

२. कल्पना—मला वाटतें इ. स. १९२२ सालची गोष्ट असावी. पुण्याला एक कविसंमेलन झालें होतें. मी त्या संमेलनाला गेलों होतों. संमेलन फारच छान झालें. एकापेक्षा एक सुंदर कविता रोज ऐकतां ऐकतां मला संमेलन चालू होतें तोंपर्यंत दोनतीन दिवस उंच स्वर्गीय वातावरणांत जाऊन राहिल्यासारखें व आनंदाच्या सागरांत पोहत आहोंत, असें वाटलें ! पाठोपाठच, तेथेच, पुण्यालाच, किंबहुना संमेलनाच्या जागींच माझ्या मनाला अशीहि अतिशय जोराची टोचणी लागली की, असे वाङ्मयाचे आनंदमहोत्सव वऱ्हाडांतहि का होऊं नयेत ! ह्या दिव्य आनंदाकरिता मला पुण्यापर्यंत कां पळत यावें लागावें ! मी एक येथे आलों, पण असे वऱ्हाडचे किती लोक इतक्या दूर येणार ? तसेंच, पुण्यामुंबईच्या लोकांनी तरी किती दूरपर्यंत काम करावयाचें ? आणि, वऱ्हाडसारख्या अखिल महाराष्ट्राच्या अगदी दुसऱ्या टोकाला असलेल्या प्रदेशाकडे जर त्यांचें पुरेसें लक्ष गेलें नाहीं, तर त्यांत तरी अस्वाभाविक असें काय आहे ? आणि पुण्यामुंबईचे लोक येऊन काम करीत नाहीत, म्हणून वऱ्हाडच्या लोकांनी ह्या आनंदाला पारखेंच राहावयाचें की काय ! तेव्हा, मी निश्चय केला की, असे वाङ्मयोत्सव वऱ्हाडांत झालेच पाहिजेत; आणि आता उमरावतीला गेल्याबरोबर ह्याचा प्रयत्न करावयाचाच. आणि, हे विचार एकसारखे माझ्या मनांत घोळूं लागले.

३. तेव्हाची स्थिति व कार्याची व्याप्तिः—वऱ्हाडांतील तेव्हाची सर्व परिस्थिति माझ्या जन्मभराच्या परिचयाची होती. पण तरी त्या वेळेस पुण्याहून परत आल्यावर त्या परिस्थितीकडे पुनः एकदा नव्या दृष्टीने पाहूं लागलों. पाहतों तों, उभ्या वऱ्हाडांत एकहि वाङ्मयविषयक कार्य करणारी संस्था नाही! एकहि इतिहाससंशोधन करणारी, किंवा नुसते जुने कागदपत्र किंवा ग्रंथ एकत्र करून ते जपून ठेवणारीहि संस्था नाही! ललितकलांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणारी एकहि संस्था नाही! एकहि चांगलें मासिक नाही! एकहि चांगली प्रकाशनसंस्था नाही!! मला हें पाहून डोक्यावर आभाळ फाटल्यासारखें वाटलें! ह्यांतलें काय काय करावयाचें, कोणी करावयाचें व कसें करावयाचें? हें एका माणसाचें काम आहे काय? ह्याचें उत्तर 'नाही' असें दिलें, तरी अनेक माणसें काम करण्यास आणावयाचीं कोठून? हें काम करूं इच्छिणारीं माणसें वऱ्हाडांत असलीं, तर हीं कामें केल्यावाचून शिल्लकच कशाला पडलीं असतीं? पण हें एका माणसाचें काम नाही असें म्हणून वऱ्हाडाला अंधारांतच लोळत पडूं द्यावयाचें काय? आणि ह्या सगळ्या प्रकारचें आणखी किती तरी प्रकारचें काम, अत्यवश्यक काम, डोळ्यासमोर शिल्लक पडलेलें दिसत असतांना, वाङ्मयानंद लुटण्याकरिता नुसतीं कविसंमेलनें वऱ्हाडांत भरविणें हें पुरेसें किंवा योग्य तरी होईल काय? हा विचार मनांत आला तेव्हा मीं ठरविलें की, नुसतीं कविसंमेलनें वऱ्हाडांत भरवावयाचीं नाहीत; हें उपर्युक्त सर्व प्रकारचें काम करील, निदान प्रयत्न करील, अशी एक **कायमची संस्थाच स्थापन करावयाची.** अशा रीतीने पुण्याहून मी जें 'कविसंमेलन' डोक्यांत घेऊन उमरावतीस परत आलों होतों, त्याची 'संस्था' बनली. आता, प्रश्न उरला कार्याच्या व्याप्तीचा. ह्या 'संस्थेने' ह्या उपर्युक्त अफाट कार्यांपैकी कोणतें, व किती कार्य हातीं घ्यावयाचें? ह्या संस्थेने त्यांतलें कोणतेंहि एकच कार्य हातीं घेतलें, किंवा दोनच कामें हातीं घेतलीं, तर बाकीच्या बाबतींत कोण आणि केव्हा जागृति घडवून आणणार? शिवाय, ह्या जागृतीच्या सर्व बाबी एका दृष्टीने अगदी परस्परावलंबी आणि एकमेकांत गुरफटलेल्या अशा आहेत. सुट्यासुट्या नाहीत. मला तर ह्या सर्व अत्यावश्यक बाबींत वऱ्हाडांत एकदम जागृति व्हावी आणि जोरदार चळवळी सुरूं व्हाव्या, ह्याविषयीं फार अधीरता वाटत होती. तेव्हा मीं ठरविलें की, कोणी मला किंवा ह्या नूतन संस्थेला हसो, व्यवहारशून्य म्हणो कीं, अधाशी म्हणो, पण अधाशीपणाच करावयाचा, आणि ह्या सर्व बाबींचा ह्या नव्या संस्थेच्या ध्येयांत व उद्देशांत अन्तर्भाव करून टाकावयाचा! त्याप्रमाणें मीं तो केलाच! आणि संघाच्या अगदी पहिल्या अधिवेशनाच्यावेळेला अपेक्षेप्रमाणे कांही लोक त्याला हसलेच! त्यावेळीं मीं त्यांना एकच उत्तर दिलें आणि तेंच अजूनहि देईन की, ह्या सर्वच बाबी अत्यावश्यक अशाच आहेत आणि बहुशांशीं परस्परावलंबीहि आहेत; ह्यांतील एकएक बाब महावृक्षाप्रमाणे प्रचंड पसरण्याजोगी आहे; हे महावृक्ष ज्यांना वाढवितां येतील, ते पुढे ते वाढवितील; पण आज त्या महावृक्षांचीं बीजें पेरून ठेवणें हें पहिलें व जास्त महत्त्वाचें काम आहे; आणि, तें आता केलें गेलेंच पाहिजे अशी वऱ्हाडांत वेळ आली आहे, त्याप्रमाणे हा संघ तें काम करणार; मग त्यामुळे त्याला कोणी अधाशी म्हणो की, कांहीहि करो. ह्याप्रमाणे संघाचे उद्देश व ध्येय ठरलें. ह्याच्या पुढला गेल्या पंचवीस वर्षांचा विदर्भाचा इतिहास जो कोणी डोळसपणें पाहील, त्याला

माझी कल्पना आहे, असेंच आढळून येईल की, ह्या पंचवीस वर्षांत विदर्भांत ज्या उपर्युक्त किंवा इतर बाबींत अनेक चळवळी झाल्या व होत आहेत, त्यांना मूळ चालना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणें विदर्भ-साहित्य-संघाच्या कार्यामुळेच मिळाली. ह्याचें नमुन्याकरिता एकच उदाहरण येथे द्यावयाचें झाल्यास तें यवतमाळच्या 'शारदाश्रमा'चें देतां येईल. ही इतिहाससंशोधन करणारी आणि प्राचीन व दुर्मिळ ग्रंथांचा संग्रह करणारी उत्कृष्ट संस्था स्थापन करण्याची स्फूर्ति आपणांस विदर्भ-साहित्य-संघाच्या कार्यामुळे मिळाली, असें त्या संस्थेचे विद्वान व निगर्वी संस्थापक डॉ. य. खु. देशपांडे हे वारंवार मोकळया मनाने बोलून दाखवितात, व तसें त्यांनी 'ऋद्धिपुरवर्णन' ह्या आपल्या प्रकाशित केलेल्या महानुभावीय ग्रंथाच्या प्रस्तावनेंत स्पष्ट लिहूनहि ठेविलें आहे. तेव्हा, ज्या उद्देशाने संघाचें ध्येय इतकें विस्तृत ठेविलें गेलें, तो चुकला नाही. ह्याप्रमाणे ह्या नूतन 'संस्थे'ची कार्यव्याप्ति प्रारंभीं ठरली. आता आपणांला पुन: हा पूर्वेतिहास पुढे चालू केला पाहिजे व तेंच करूं.

४. प्रदेशव्याप्तिः—नंतर पुढला प्रश्न प्रदेशव्याप्तीचा. ह्या संस्थेने कार्य कोणत्या प्रदेशांत करावयाचें? अखिल महाराष्ट्रांत खासच नव्हे. कारण, अखिल-महाराष्ट्रांत ह्या प्रकारचें काम करण्याकरिता पुण्यामुंबईकडे संस्था स्थापन झालेल्या होत्या आणि त्या आम्हांला मान्यहि होत्या. मी स्वत: 'महाराष्ट्रसाहित्य परिषदे'चा सभासद होतों. त्या संस्थांना प्रतिस्पर्धी संस्था काढण्याची इच्छा नव्हती व गरजहि नव्हती. पुण्यामुंबईच्या लोकांना आपआपलें स्थानिक कार्य करण्यास आपापल्या स्थानिक संस्था होत्याच. आबाळ चालली होती ह्या केंद्रापासून दूर असलेल्या अखिल महाराष्ट्राच्या प्रदेशांचीच. तेव्हा, असें ठरविलें की, पुण्यामुंबईच्या लोकांचे जेथे हात पोहोचत नाहीत, असे जे अखिल महाराष्ट्राचे उपेक्षित प्रदेश-त्या सर्वांचा ह्या नव्या संस्थेच्या कार्यक्षेत्रांत अन्तर्भाव करावयाचा. ही कल्पना ठरल्याबरोबर असे प्रदेश कोणते, म्हणून जों पाहूं लागलों, तों आढळून आलें की, प्राचीनकाळीं ज्याला 'विदर्भ' म्हणून म्हणत, तोच आणि नेमका तेवढाच प्रदेश ह्या आबाळीच्या कचाट्यांत सापडलेला आहे. त्याबरोबर, 'वऱ्हाडांत काम करावयाचें,' 'वऱ्हाडांत जागृति करावयाची,' असें जें माझ्या डोक्यांत 'वऱ्हाडच' फक्त भरलें होतें, तें एकदम निघून गेलें आणि 'विदर्भांत काम करावयाचें,' ह्या कल्पनेंची तेथे स्थापना झाली. विदर्भ हें कार्यक्षेत्र ठरल्यावर मग स्वाभाविकपणेंच व उपर्युक्त कारणास्तव मी त्यांत (१) 'वऱ्हाड' ह्या नांवाखालीं वर्तमानकालीं मोडणारे चार जिल्हे (२) मध्यप्रांतांतील मराठी भाषा बोलणारे चार जिल्हे (३) निजामशाहींतील 'मराठवाडा' व (४) पूर्व खानदेश ह्या प्रदेशांचा अन्तर्भाव केला. पश्चिम खानदेश ह्यांतून ह्याकरिता सोडला की, तेथील लोकांचा पुण्यामुंबईशीं आधीच संबंध होता, व तेथे तिकडून कार्य होत होतें. तेव्हा तेथे कार्य नवें सुरू करण्याची गरज नव्हती. पश्चिम खानदेश मात्र उपेक्षित होता व स्वाभाविकपणें विदर्भांत मोडतहि होता म्हणून तो घेतला.

५ नांव—संस्थेची उद्देशव्याप्ति ठरली, प्रदेशव्याप्ति ठरली, राहतां राहिलें नांव. ह्या लेखाचा विषय सुचवून त्याची मागणी करतांनाच 'युगवाणी'च्या

संपादकांनी मासिकाच्या चिमुकल्या आकारामुळे तो आटोपशीरहि झालाच पाहिजे,

अशी वारंवार मला सूचना दिली आहे ! म्हणून कोणकोणतीं नांवें ह्या नवनियोजित संस्थेकरिता प्रारंभीं सुचलीं व तीं सर्व अखेरीस कां टाकलीं, ह्या एका दृष्टीने अनवश्यक असलेल्या वृत्तान्ताचा फापटपसारा बाजूस सारून, जें नांव अखेर ठरविलें, तें का ग्रहण केलें, एवढीच मुद्याची गोष्ट सांगणार आहे. उद्देश व प्रदेश ह्यांचा चटकन् स्पष्टपणें व पूर्ण बोध होईल, असेंच नांव सर्वांत उत्तम, असेंच शेवटीं वाटलें व म्हणून प्रदेशास्तव 'विदर्भ' व उद्देशास्तव 'साहित्य' हे दोन ह्या नांवांतील शब्द मी प्रथम कायम केले. पण ह्या दोन शब्दांच्या पुढे मग 'संस्था' 'परिषद्', 'समिति', 'मंडळ', 'संघ' वगैरे अनेक शब्दांपैकी कोणता संघटित समूहवाचक तिसरा शब्द लावावा, हा विचार मला बरेच दिवस पडला. अखेर, माझे सर्वांत वडील बंधु ती. बाबासाहेब ह्यांच्या सल्ल्याने असें ठरविलें की, बौद्धधर्मेतिहासांत अतिशय गाजलेला जो 'संघ' शब्द, तोच ऐतिहासिकतेच्या, प्राचीनतेच्या, पवित्रतेच्या व सूचकतेच्या दृष्टीने सर्वांत उत्तम, आणि म्हणून तो घेतला आणि या 'संस्थे'चें नांव पूर्ण झालें. पण त्याचबरोबर 'संस्थे'चा 'संघ' बनला हें ह्या कल्पनेंतील तिसरें परिवर्तन होय, असें म्हणतां येईल.

६. संघाने केलेल्या नवीन गोष्टीः—वरील इतिहास ज्यांनी थोडाहि लक्षपूर्वक वाचला असेल त्यांच्या ध्यानांत सहज येईल की, विदर्भ साहित्य संघाने पुष्कळच नवीन गोष्टी जन्मतांना केल्या : (१) अगदी पहिली गोष्ट ही की, संघाने पुष्कळच आवश्यक व उपयुक्त अशा कार्यांचीं बीजें पेरलीं. पुढे म्हणजे गेल्या पंचवीस वर्षांत विदर्भांत झालेल्या अनेक कार्यांचें व चळवळींचें मूळ उगमस्थान आणि स्फूर्तिस्थान विदर्भ साहित्य संघच होय. (२) संघाने 'विदर्भ' हा आता प्राचीन, अगदी उपनिषत्कालापासून चालत आलेला शब्द व त्या प्रदेशाची कल्पना शेकडो वर्षांनंतर अगदी प्रथम पुनरुज्जीवित केली. ह्यानंतर गेल्या पंचवीस वर्षांत, कापडाच्या गिरण्यातागायत अनेक संस्थांनी हा शब्द आपल्या नांवांत वापरला, पण तो अगदी प्रथम संघानेच पुनरुज्जीवित केला. (३) निजामशाहीच्या अंधेर नगरींत सापडलेल्या 'मराठवाड्या'ची आठवण अगदी प्रथम विदर्भ साहित्य संघालाच झाली. त्या प्रदेशाचा अन्तर्भाव आपल्या कार्यकक्षेंत अगदी प्रथम कोणी केला असेल, तर तो विदर्भ साहित्य संघानेच केला. ह्यानंतर मग मराठवाड्यास कितीहि सहानुभूति दाखविली गेली असो, आज अखिल महाराष्ट्रांत मराठवाडाहि अन्तर्भूत करून घेण्याचे कितीहि प्रयत्न होत असोत (—आणि ईशदयेने ते सफल होऊन मराठवाड्याचा त्याप्रमाणे अखिल महाराष्ट्रांत अन्तर्भाव होवो—), पण त्या अंधारांत आणि दुर्दशेंत पडलेल्या, मराठीच्या जन्मभूमींतल्या, मराठीचें पुण्यक्षेत्र म्हणून शोभणाऱ्या त्या भागांतल्या, दुर्दैवी महाराष्ट्रीयांची आठवण अगदी प्रथम संघाला झाली, ही गोष्ट कोणाहि इतिहासज्ञास नाकबूल करतां येणार नाही. (४) चवथी गोष्ट, अखिल महाराष्ट्र हा एक प्रान्त-असावा, त्याच्या पोटांत पश्चिम महाराष्ट्र व महाविदर्भ असे दोन उपप्रान्त किंवा उपप्रदेश असावे, निमी राज्यघटना दोन्ही उपप्रदेशांना समान म्हणजे एकच असावी व निमी निराळी निराळी असावी, असे बेत व प्रयत्न आज राजकीय कार्यकर्त्यांचे चाललेलें सर्वश्रुतच आहेत. विदर्भ साहित्य संघाने हेंच हुबेहुब आधीच केलेलें आहे. अखिल महाराष्ट्राच्या साहित्यसंस्था विदर्भासह अखिल महाराष्ट्रास समान, म्हणजे मान्य करून, पश्चिम

महाराष्ट्र तत्रस्थांस कार्य करण्यास मोकळा सोडून महाविदर्भांतील कार्यासाठीं विदर्भ साहित्य संघ अस्तित्वांत आला आहे. जें राजकीय कार्यकर्त्यांच्या दृष्टीला आज दिसूं लागलें आहे, तें साहित्याच्या क्षेत्रांत वावरणाऱ्या विदर्भ साहित्य संघाच्या दृष्टीला पंचवीस वर्षांपूर्वींच दिसलें ! एका अखिल महाराष्ट्राची आणि तदन्तर्गत दोन उपप्रान्तांची कल्पना राजकीय कार्यकर्त्यांची नाही. ती कल्पना विदर्भ साहित्य संघाची आहे आणि पंचवीस वर्षांपूर्वींची आहे ! संघाने विदर्भांत पुढे पंचवीस वर्षांत केलेलें काम निराळेंच. पण त्याने जन्मल्याबरोबरच आपोआप ह्या चार अगदी नव्या आणि फार महत्त्वाच्या गोष्टी केल्या.

७. पहिला पत्रव्यवहार:— वर लिहिल्याप्रमाणे उद्देश, प्रदेश, नांव, वगैरेंची रूपरेषा माझ्या मनांत तयार झाल्यानंतर मीं संपूर्ण ' विदर्भा 'तील साहित्यिकांशी व प्रमुख व्यक्तींशीं पत्रव्यवहार सुरू केला. कोणीहि नांव घेण्याजोगी व्यक्ति सोडली नाही. आम्हींच काढलेल्या ' अरुण ' छापखान्याची व्यवस्था पाहणें व ' उदय ' पत्राचें संपादन करणें हीं माझीं व्यावहारिक कामें संभाळून, हा सर्व पत्रव्यवहार मीच एकटा करीत असें. सर्वांनी अगदी निरपवादपणें माझ्या कल्पनेचें अतिशय उत्साहाने व आनंदाने स्वागत केलें व मला प्रोत्साहन दिलें. मला अतिशय आनंद झाला. विशेषतः मी जी प्राचीन ' विदर्भा 'ची कल्पना पुनरुज्जीवित करीत होतों व त्यासाठीं त्याच्या कक्षेंत ज्या चार प्रदेशांचा स्वाभाविकपणेंच अन्तर्भाव होत होता, व म्हणून मी केला होता, त्या चारहि प्रदेशांनीं ह्या प्रयत्नांत व कार्यांत सामील होण्याचें मोकळ्या मनाने, इतकेंच नव्हे, तर फार आनंदाने व उत्साहाने कबूल केलें, हें मीं पाहिलें, तेव्हा तर माझ्या आनंदाला भरतें आलें; आणि, मी झटून ह्या कामाला लागलों. हे सर्व प्रदेश इतक्या आनंदाने ह्या कार्यांत येतीलच, अशी मला खात्री वाटत नव्हती. म्हणून मन धाकधूक करीत होतें. पण ईशदयेने कल्पनेच्याबाहेर सर्व उत्तम झालें. ह्या पत्रव्यवहारांत, आपुली आठवण महाराष्ट्रांत कोणाला तरी झाली आणि आपल्याहि प्रदेशांत जागृतीचा कांही तरी प्रयत्न अखेर होऊन आपल्याला साह्यकर्ते कोणीं तरी लाभणार, ह्या आनंदाने निजामशाहींतील मराठवाड्यांतून जीं कळकळीचीं, तळमळीचीं व प्रेमळ पत्रें मला आलीं, तीं मी जन्मभर विसरणार नाही ! हा सर्वच पत्रव्यवहार एक स्वतंत्र गठ्ठा बांधून व ' संघस्थापने पूर्वीचा पत्रव्यवहार ' म्हणून त्यावर लिहून मी संघाच्या दप्तरांत अनेक वर्षे जपून ठेवला होता. पण पुढे इतरांच्या कारकीर्दींत तो हरवला असावा, असें वाटतें !

८. पहिलें अधिवेशन:—ह्याप्रमाणे पत्रव्यवहार करून मग संघाच्या स्थापनेकरता ' विदर्भांतील सर्व साहित्यप्रेमी लोकांची सभा ' इ. स. १९२३ सालीं जानेवारीच्या १३ व १४ तारखांना उमरावतीलाच ' ब्रह्मविद्यामंदिरा 'त संक्रान्तीच्या मुहूर्तावर बोलाविली. हेंच संघाचें पहिलें अधिवेशन. सर्व पाहुणे आमच्याच वाड्यांत उतरवून घेतले होते व सर्व प्रमुख लोक आले होते. अतिशयच उत्साह व आनंद सर्व वातावरणांत होता. कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे अध्यक्ष होते. रीतीप्रमाणे पहिले दिवशीं स्वागताध्यक्ष, अध्यक्ष, ह्यांचीं भाषणें वगैरे होऊन दिनांक १४ जानेवारीला सकाळीं सर्व प्रदेशांचीं प्रातिनिधिक भाषणें होऊन मोठ्या उत्साहाने संघाच्या स्थापनेचा ठराव सर्वानुमतें संमत झाला, व संघ अस्तित्वांत आला. ह्याच

अधिवेशनांत कै. प्रिं. दा. के. ओक ह्यांच्या मध्यस्थीने 'शशिसेना' ह्या जुन्या काल्पनिक काव्याचें हस्तलिखित संघास मिळालें. हेंच पुढे कै. या. मा. काळे यांच्याकडून संपादित करून घेऊन नागपुरास एका मासिकांतून –'वागीश्वरी' तून– प्रकाशित करवून घेण्यांत आलें. ह्याशिवाय एक तरवार, लाखेने चामड्यावर काढलेलीं जुनीं सुंदर चित्रें वगैरे कितीतरी सामान संघास लोकांनी आपण होऊन प्रेमाने दिलें. पत्रव्यवहाराला आलेलीं उत्तरें व ह्या अधिवेशनांतील हा सर्व लोकांचा उत्साह व प्रेम ह्यावरून हेंच दिसून आलें की, विदर्भात ह्याप्रकारच्या संस्थेची गरज होती; लोक तिच्यासाठी आतुर होते. मी सरचिटणीस निवडलो गेलों व पुढे दर अधिवेशनांत निवडला जाऊं लागलों, 'केसरी'–ने संघाच्या स्थापनेबद्दल फार अनुकूल स्फुट लिहिलें. ह्याच अधिवेशनांत एके दिवशीं संध्याकाळीं तात्यासाहेब कोल्हटकर ह्यांनी आपल्या एका नाटकांतील 'तुजविण वृथा गमे संसार' हे पद तंबोरा घेऊन सर्व प्रतिनिधींस सुंदर म्हणून दाखविलें व स्मृतीच्या चमत्कारांचा एक कार्यक्रम करुन दाखविला! अध्यक्ष तात्यासाहेब ह्यांचा हा निगर्वीपणा व साधेपणा पाहून सर्वांस फार आनंद झाला व त्यांचा गुणीपणा पाहून त्यांच्याविषयींचा आदर द्विगुणित झाला. ह्याच अधिवेशनांतील आणखी एक लहानशी गंमत ही की, अधिवेशनाच्या दिवशीं सकाळीं कै. तात्यासाहेब कोल्हटकरांनी श्मश्रु करविला व ते न्हाव्यास पैसे देऊं लागले. (आमचेकडेच त्यांसहि उतरवून घेतलें होतें; आणि त्यांना कोट्या करण्याची अतिशय आवड असे, हें प्रसिद्धच आहे.) तेव्हा आमच्या बंधूंनी, ती. बाबासाहेबांनी, त्यांना विनोदाने म्हटलें, "हें काय, तात्यासाहेब? छे, छे! त्याचे पैसे आम्ही देऊं. आम्हाला निदान अध्यक्षाची हजामत केल्याचें तरी श्रेय मिळूंद्या!"— तेव्हा तात्यासाहेबहि मोठ्याने हसले व त्यांनी पाकीट खिशांत परत टाकलें!

९. **कामास सुरवातः**—छापखाना व वर्तमानपत्र यांसाठी दुपारचा फक्त जेवणाचा वेळ सोडून, मला सकाळीं ७–३० ते संध्याकाळीं ५–३० रोज नियमाने काम करावें लागे. रात्रीं जेवणानंतर संघाचें काम होणें शक्य नसे. त्यामुळें मी असें केलें की, रोज संध्याकाळीं ५–३० ला तें काम संपलें की, लागलीच ५–३० ते ६–३० एक तास संघाचें काम करावयाचें, तेव्हाच कार्यालयांतून बाहेर पडावयाचें. सुटीच्या दिवशीं जरूरीप्रमाणे ह्या संघाच्या कामास जास्तहि वेळ देत असे. ह्याप्रमाणे इ. स. १९२३ पासून, इ. स. १९२९ ऑगस्टमध्ये हिंदुविश्वविद्यालयांतील जागा पत्करून काशीस येईपर्यंत, मी अव्याहतपणें व बिनचूकपणें काम केलें. ह्यापेक्षा जास्त वेळ मात्र मला देतां येणें शक्य नव्हतें. रोज संध्याकाळीं डोकें शिणून व शरीर थकून जात असे. पण इतकेंहि करून एकट्याच्याने सर्व काम होत नाही, असें दिसून आलें, तेव्हा अरुण–उदय–कार्यालयांतल्या एकाद्या कारकुनाला किंवा मुद्रितें तपासणाराला, संघाच्या कार्यकारी मंडळाच्या संमतीने, मी संघातर्फे पांच रुपये दरमहा देऊन, ह्या संघाच्या तासांत त्याला मदतीला घेऊं लागलों. कोणत्याहि चांगल्या संस्थेच्या कार्यालयांत असतात त्या नोंदीच्या सर्व प्रकारच्या वह्या, जुने-नवे कागदपत्र, ग्रंथ, फाइलें, नमुने—वगैरे तर सर्व आमच्या ह्या संघाच्या कार्यालयांत होतेंच, पण त्या सर्वांतील लेखन, त्यांची वर्गवारी व त्या सर्वांची ठेवण्याची व्यवस्था हें सर्व आम्ही इतकें व्यवस्थित, उत्तम व टापटिपीचें ठेवलें होतें की, एकदा धुळ्याचे रा. शंकर श्रीकृष्ण देव हे उमरावतीस आले असतां त्यांना

जेव्हा मी आमचें संघाचें सर्व कार्यालय दाखविलें, तेव्हा ते म्हणाले, "मीं पुष्कळ संस्थांचीं कार्यालयें पाहिलीं आहेत; पण इतकें व्यवस्थित कार्यालय मीं कधींहि पाहिलें नाही." विदर्भांतील सर्व विद्यमान ग्रंथकारांच्या छापील ग्रंथांचा संग्रह करणेंहि आम्ही सुरू केलें होतें व तें ग्रंथहि त्यांत होते. आणि ज्या कोणी संघाला जुन्या ग्रंथांची किंवा कागदपत्रांची देणगी कबूल केली असेल, किंवा ज्यांच्या जवळ ते आहेत, असें कळेल, त्याचें नांव व पत्ता मांडून ठेवून दरमहिन्याला त्याला त्यांची मागणी करण्याकरता नियमितपणें पत्र टाकण्याकरता एक 'तगाद्याची नोंदवही' हि त्यांत होती !

१० दुसरें अधिवेशनः—दुसरें अधिवेशन आम्हीं मुद्दाम मराठवाड्यांतच, व त्यांतहि नाथांच्या पैठणलाच, भरविण्याचें ठरविलें. त्यावेळीं पैठणमध्ये भाकरे ह्या नांवाचे कोणी एक पोक्त वयाचे सावकार होते, त्यांच्या हातीं ह्या अधिवेशनाचें सर्व काम होते. मग ते तेथील स्वागताध्यक्षच होतें की काय, हें मात्र आठवत नाही. पुष्कळ पत्रव्यवहार झाला, तेव्हा दिसून आलें कीं, ह्या पैठणांत पुष्कळ भानगडी आहेत आणि ह्या मंडळींच्याने संघाचें अधिवेशन रेटवेल की नाही ह्याची शंकाच आहे. तेव्हा भाकरे हे स्वतः उमरावतीला आले. त्या म्हाताऱ्याची ती रुबाबदार आकृति, त्याची अत्यन्त मिठास वाणी आणि अतिशय मुत्सद्दीपणाचें व धोरणी बोलणें हें पाहून मी, तो. बाबासाहेब, माझे मित्र रा. वासुदेवराव भोळे, सर्व गारच झालों ! पैठणला आम्ही अधिवेशनाला परवानगी दिली ! रा. भाकरे परत गेले. आणि पैठणास पोहोचतांच त्यांचा पुनः मुत्सद्दीपणाचा पत्रव्यवहार सुरू झाला ! इतक्यांत भाकऱ्यांनी तेथे स्वागतमंळाच्या चिटणिसाच्या जागीं जो मनुष्य नेमला होता, त्याच्या प्रामाणिकपणावर आक्षेप घेणारी तक्रारीचीं फार पत्रें येऊं लागली ! आणि, त्याचा कांही तरी पुरावा आम्हालाहि तेव्हा प्रत्यक्ष मिळाला. तेव्हा आम्ही भाकऱ्यांच्या मागें एकसारखें टुमणें लावलें की, 'ह्या माणसाला तुम्ही स्वागतमंडळाच्या चिटणीशीच्या जागेवरून काढा.' संघाच्या अधिवेशनाच्या प्रसिद्ध झालेल्या तारखेला बरोबर आठ दिवस राहीपर्यंत रा. भाकरे ह्यांनी आम्हाला कांहीच दाद दिली नाही ! आणि, ज्या दिवशीं अधिवेशनाला बरोबर आठच दिवस उरले, त्या दिवशीं आम्हाला त्यांनी तार केली की, 'ह्या माणसाला चिटणीस म्हणून कबूल कराल, तरच अधिवेशन आम्ही भरवितों; नाहीतर, भरवीत नाही !' आमचें 'काउन्सिल' भरलें; आणि आम्हीहि भाकऱ्यांना त्याच दिवशीं ताबडतोब उलट तार ठोकली की, "संघाने तुम्हाला हें अधिवेशन तेथे भरविण्याला दिलेली परवानगी ह्या तारेने काढून घेतली आहे." आणि त्याच दिवशीं ताबडतोब सर्व प्रमुख वर्तमानपत्रांकडे तारा केल्या की, 'संघाच्या अधिवेशनाच्या तारखा कायम आहेत, मात्र जागा बदलली आहे. आता हें अधिवेशन पैठणास न होता त्याच तारखांस उमरावतीस ब्रह्मविद्यामंदिरांत होईल.' आणि, तारेनेच अध्यक्षांस विनंति

करून व आठ दिवसांत संपूर्ण तयारी करून बरोबर त्याच तारखेस उमरावतीस कै. या. मा. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं हे अधिवेशन अत्यन्त यशस्वीपणे पार पडलें. अशा रितीने संघाचे दुसरें अधिवेशनही अमरावतीसच पुन्हा होण्याचा योग आला ! ही इ० स० १९२४ तली गोष्ट आहे.

११. यवतमाळः—१९२६ सालीं यवतमाळला कै. न. चिं. केळकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं संघाचें तिसरें अधिवेशन झालें. तात्यासाहेबांनाच आम्हीं अध्यक्ष करून टाकलें, हें "पुण्याविरुद्ध बंड करण्याकरता संघ उभारला गेला आहे"—ही जी कुजबूज कोठे कोठे चालूंच होती, तिला उत्तर होतें ! तात्यासाहेबहि अतिशय मोकळ्या मनाने अध्यक्ष झाले, हें त्यांच्या थोर पणास उचित असेंच झालें. ह्या अधिवेशनांतील एक गंमत आठवते. आम्हांला उतरण्याला एक शाळा दिली होती. एके दिवशीं दुपारीं विश्रान्तीच्या वेळीं तेथे एक माणूस आला व ."तुम्हांला कांही शंका विचारावयाच्या आहेत"—म्हणून मला म्हणूं लागला. मीं "विचारा"—म्हणून सांगितलें. त्याने अगदी पहिली कोणती शंका विचारली, हें आता मला आठवत नाही. पण मीं उत्तर दिलें की, त्यांतील अगदी शेवटल्या वाक्यांत जें विधान असेल, किंवा माझ्या उत्तराचा जो अगदी शेवटला शब्द असेल, तो धरून "ह्याचा अर्थ काय ?" असें त्याने एकसारखें कांही तरी नवें व भलतेंच विचारीत जावें ! असा क्रम पुष्कळ वेळ चालला ! हा कोणी तरी वेडा, विक्षिप्त किंवा मुद्दाम व्यर्थ छळवाद करण्यासाठी आलेला असा मनुष्य आहे, ह्याला खऱ्या शंका वगैरे कांहीहि विचारावयाच्या नाहीत, हें मीं थोड्याच वेळांत ओळखलें. तेव्हा मी त्याला चूप करण्याचा आणि घालवूनहि देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण तो कांही केल्या जाईना, त्याचें फाटे फोडणें संपेना आणि तो चूपहि बसेना ! त्याने मला अगदी शेवटला विचारलेला प्रश्न माझ्या पूर्ण लक्षांत आहे. माझ्या ह्याच्या पूर्वीच्या उत्तराचा अगदी शेवटला शब्द "आहे" हा होता. तो माणूस मला लागलींच विचारूं लागला, "आहे म्हणजे काय ?" मला ज्या खोलींत उतरण्यास जागा दिली होती, ह्याच खोलींत माझ्या उजवीकडे दोनचार हातांवर नागपूरचे प्रसिद्ध कवि कै. ज. के. उपाध्ये ह्यांचें बाडबिस्तर होतें. ते ह्यावेळीं बिस्तऱ्यावर लोळत पडलेले होते. माझे त्या माणसाने चालविलेले हाल ज्या वेळीं ह्या थराला येऊन पोचलेले त्यांनी पाहिले व त्या माणसाचा हा शेवटचा प्रश्न जेव्हा त्यांनी ऐकला, तेव्हा ते ताडकन् उठून आले; आणि, त्या माणसाला म्हणाले, "थांबा, 'आहे' म्हणजे काय, हें मी तुम्हांला सांगतों." आणि, असें म्हणून त्यांनी हरसाल नागपुरी भाषेत, 'बोवा' (हें उपाध्यांचें टोपण नांव) जणु कांही एकाद्या वैद्यकीय विद्यालयांत शरीरशास्त्र शिकवीत आहेत, इतक्या प्रांजळपणें व त्या माणसाच्या कांही नातेवाईकांच्या उद्धारासकट, जेव्हा त्याला हा सर्व विषय समजावून सांगितला, तेव्हा, "आता माझें समाधान झालें" असें म्हणून तो मनुष्य उठून गेला ! ! शिष्ट समाजाने ज्या भाषेची निर्दयपणें इतकी गळचेपी चालविलेली आहे त्या भाषेची उपयुक्तता व सामर्थ्य ह्या दोहोंविषयींहि त्या दिवशी माझी खात्री पटली ! !

१२ इतर अधिवेशनें:—ह्यानंतर १९२७ साली हैद्राबादला कै. चिं. वि. वैद्य ह्यांच्या अध्यक्षतेखालीं संघाचें जें चवथें अधिवेशन झालें, त्याला मला स्वत:लाच जातां आलें नाही! पांचवें अधिवेशन १९२८ सालीं खानदेशांत जळगांवाला झालें. अध्यक्ष हैद्राबादचे हायकोर्ट जज्ज कै. न्यायमूर्ति केशवरावसाहेब होते. ह्या अधिवेशनांत स्वागत मंडळाने अधिवेशनांत म्हटल्या गेलेल्या उत्तम कवितेला एक बक्षीस ठेविलें होतें. ह्याच्या आधी थोडेच दिवस मीं रचलेली 'विदर्भगीत' ही माझी कविता मीं ह्या संमेलनांत म्हटली होती. सर्वांना ती फार आवडली होती. तेव्हा तेथील स्वागत मंडळाचे लोक मलाच तें पहिलें बक्षीस देतों, असें म्हणूं लागले! ते ऐकेनात! मला मोठी पंचाईत पडली. इतक्यांत बडोद्याच्या अखिल महाराष्ट्र साहित्य संमेलनांत 'कोणता मानूं चंद्रमा' ही आपली प्रख्यात कविता म्हणूनच व प्रत्येक कडव्याला टाळ्यांचा कडकडाट व वाहवा घेऊन नुकतेच परत आलेले माझे कविमित्र रा० गुणवंत हनुमंत देशपांडे ह्यांनी आपली एक फारच सुंदर कविता ह्या अधिवेशनांत म्हटली व हें पहिले बक्षिस सुदैवाने त्यांना देण्याचे ठरलें. ज्या संस्थेचा मी सरचिटणीस, त्या संस्थेत मींच आपल्या हाताने आपल्या तोंडाभोवती दिवे ओवाळून घेतले, ह्या भावी संभाव्य आरोपातून माझी मुक्तता झाली! संघाचे सहावे अधिवेशन १९२९ सालीं नागपुरास माझे वडिल कै. ती. दादासाहेब खापर्डे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्या अधिवेशनाला कै. प्रसिद्ध विद्वान लक्ष्मण रामचंद्र पांगारकर उपस्थित होते. दादा साहेबांनी आपल्या भाषणांत ओघाओघांत "उदयगूढशशाङ्क मरीचिभिः" ह्या कालिदासाच्या सुंदर श्लोकाचा अर्थ जेव्हा खुलवून फारच बहारीने सांगितला, तेव्हा त्यांचें भाषण संपल्यावर खुर्चीवरून उठून उपरणें झाडतां झाडतां रा. पांगारकर ती. दादासाहेबांकडे नजर टाकून म्हणाले, "असा रसिक पुरुष उभ्या महाराष्ट्रांत दुसरा नाही!"

१३. "मध्यन्तर"!—चलचित्रपटांत अलीकडे मधल्या सुटीला 'मध्यंतर' म्हणण्याची रीत पडली आहे. तशीच ह्यापुढे संघाची स्थिति झाली. १९२३ ते १९२९ ह्या सहा वर्षांत संघाचीं सहा अधिवेशनें झालीं, हें वरील हकीकत वाचणाऱ्यांच्या लक्षांत आलेंच असेल. त्याचप्रमाणे, संघाने हातीं घेतलेलीं सर्व कामेंहि तोंवर बरोबर चाललीं होती. १९२९ सालीं मी काशीस आलों. संघाचें काम माझ्या माघारीहि तिकडे चालूंच राहावें, अशी मी आपल्याकडून झाली ती सर्व व्यवस्था केली. पण दुर्दैवाने तें चालूं राहिलें नाही! मी दर सुटींत घरीं आलों म्हणजे विदर्भांतील जो कोणी संघाचें काम चालूं ठेवण्याजोगा मला भेटेल, त्या प्रत्येकाला संघाचें काम चालूं ठेवण्याविषयीं, किंवा निदान संघाचीं अधिवेशनें तरी दरसाल चालूं ठेवून संघ जिवंत ठेवण्याविषयीं सांगून सांगून दमलों. पण दुर्दैवाने कोणीच पुढे येऊन जबाबदारी व काम अंगावर घेऊन तें पार पाडण्याला सरसावेना. असा क्रम आठ वर्षे चालला! मी संघ जिवंत ठेवण्याच्या

बाबतींत अगदी निराश होत चाललों. इतक्यांत १९३७ सालीं संघाच्या पुनरुज्जीवनाचा एक प्रयत्न झाला! पण ह्यापुढला कांहीं वर्षांचा, प्रा. श्री. ना. बनहट्टी कंबर बांधून पुढे येऊन त्यांनी संघाचें काम दृढनिश्चयाने हातीं घेईपर्यंतचा, इतिहास इतका दुःखकारक आहे की, 'युगवाणी' च्या संपादकांनी संघाची जन्मकथा व त्याचा बाल्यकाल ह्यावरच फक्त हा लेख लिहिण्याची मला आज्ञा केली असल्यामुळे ह्या 'मध्यन्तरा' च्या कालाविषयीं लिहिणें माझ्या नशीबी आलेलें नाही, हें मी आपलें मोठेंच सुदैव समजतों! फक्त एका वाक्यांत वाचकांच्या माहितीसाठी येवढेंच सांगतों की, संस्थांच्या बाबतींत जें जें अनिष्ट होण्याचा संभव असतो, तें तें बहुतेक सर्व ह्या काळांत विदर्भ साहित्य संघाच्या बाबतींत होऊन गेलें! म्हणून मी १९२९ ते १९४४ ह्या कालाला 'संघाचा संकटकाल' म्हणतों आणि, १९४५ च्या मार्च मधील आकोटच्या अधिवेशनापासून 'संघाच्या (खऱ्या) पुनरुज्जीवना' चा तिसरा कालखंड आता सुरू झाला आहे, असें मानतों. १९४६ मध्ये दर्यापूरला संघाचें एक अधिवेशन झालें व १९४६ च्याच डिसेंबरांत पुसदला दुसरें अधिवेशन झालें. गोंदियाला एक होणार आहे. हीं सर्व तिसऱ्या कालखंडांत पडतात. पण संघाचा 'बाल्यकाल,' पाहिला कालखंड, हा पहिल्या सहा वर्षांचा. तो 'बाल्यकाल' वर थोडक्यांत सांगून झाला आहे.

विदर्भ साहित्य संघाचीं गेलीं पंचवीस व
(अहवाल)

प्रा. ना. कृ. दिवाणजी, एम्.ए.
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

प्रास्ताविक

ता. ५ नोव्हें. ४८ रोजीं गोन्दिया (मध्यप्रांत) येथे, बिहारचे गव्हर्नर ना. डॉ. ना. माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ साहित्य संघाचा " रौप्य महोत्सव " साजरा होत आहे. या शुभ प्रसंगीं वि. सा. संघाचा गेल्या २५ वर्षांचा अहवाल सादर करीत असतां मला अत्यंत आनन्द होत आहे. कार्य आनन्दाचें तर खरेंच आहे, पण त्याबरोबरच तें फार कठिणहि आहे. कठिण या अर्थाने म्हणतों की, मी जरी सन १९४४ पासून आजपर्यंत सतत चार वर्षे सरचिटणीस म्हणून संघाचें दप्तर सांभाळत आहें, तरी माझ्याजवळ अमरावती येथे असलेल्या मध्यवर्ती कार्यालयांत जुने कागदपत्र मुळीच नाहीत. अहवाल तयार करावयाला जुना पत्रव्यवहार, वृत्तपत्रांत त्या त्या काळीं प्रसिद्ध झालेले वृत्तान्त, अध्यक्ष-स्वागताध्यक्षीय भाषणें, ठराव, कार्यक्रमांची माहिती इत्यादि सामुग्रीची आवश्यकता असते. त्याशिवाय सविस्तर अहवाल कसा तयार करणार ? हे जुने कागदपत्र केव्हा व कसे नाहीसे झाले याचा शहानिशा करीत बसून तरी हा प्रश्न कसा सुटणार ? तेव्हा 'सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम्' या न्यायाने 'अप्रिय सत्य' उकरण्याच्या भानगडींत न पडतां, जुन्या पिढीच्या स्मरणाच्या गाळणींतून जेवढें हातीं पडलें तेवढेंच या अहवालाच्या रूपाने सादर करतों आणि म्हणूनच त्रोटकता आणि असुसंगतता या दोषांपासून हा अहवाल अलिप्त असणें शक्य नाही एवढें नमूद करतों.

स्थापना

'विदर्भ साहित्य संघा'ची स्थापना, संस्थेचे पहिले सरचिटणीस आणि सध्या बनारस येथे हिंदु विश्वविद्यालयांत असलेले विद्वान् प्राध्यापक व वैदर्भीय साहित्यिक कविभूषण ब. ग. खापर्डे यांच्याच प्रेरणेने व खटपटीने अमरावती येथे ता. १३ जानेवारी १९२३ रोजीं संक्रान्तीच्या सुमुहूर्तावर झाली. पुण्यामुंबईपासून दूर असलेल्या विदर्भात अशा तऱ्हेच्या संस्थेची जरूर होतीच आणि त्यामुळेच संस्थापकांच्या कल्पनेला त्याकाळीं विदर्भाच्या कानाकोपऱ्यांतून पाठिंबा मिळाला. इतकेंच नव्हे तर, सन १९२३ पासून सन १९२९ पर्यंत विदर्भ साहित्य संघाचें कार्य जोमाने चालू राहिलें आणि विदर्भांत मराठी साहित्यिकांची मोठी संघटना निर्माण होऊन, मराठी भाषा आणि साहित्य यांच्या अभिवृद्धीची चळवळ फैलावूं लागली.

स्थापनेपासून आजपर्यंतच्या २५ वर्षांच्या काळाचे सन १९२३ ते १९२९, १९२९ ते १९३७, १९३७ ते १९४४ आणि १९४४ ते १९४८ असे कालखंड साधारणतः पडतात. त्यांत प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीने आरंभींचा व अखेरचा कालखंड महत्त्वाचा आहे; आणि १९३७ सालाने या दोन कालखंडाचा दुवा जोडलेला आहे. कारण १९२९ ते १९३७ या कालखंडांत विदर्भ साहित्य संघाच्या कार्यात खंड पडला आणि पुढे १९३७ सालीं पुनः वि. सा. संघांत चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न अमरावतीला झाला. परंतु ही मात्रा चांगलीशी लागू पडलेली दिसत नाही. कारण पुढे पुनः १९३७ पासून १९४४ पर्यंत संघाचें कार्य स्थगित झालें. पुनरुज्जीवनानंतर १९४४ पासून मात्र चार वर्षेंपर्यंत वि. सा. संघाचें कार्य अबाधितपणें चालू आहे.

संमेलनें व संमेलनाध्यक्ष

वरील आढाव्यावरून एक गोष्ट सहज लक्षांत घेण्यासारखी आहे की, वि. सा. संघाच्या स्थापनेला जरी २५ वर्षें झालीं असलीं, तरी प्रत्यक्ष कार्याचें मुख्य प्रतीक जें 'संमेलन' तें मात्र समप्रमाणांत राहिलें नाही. गेल्या २५ वर्षांत झालेल्या वि. सा. संमेलनांची माहिती खालीं देतों, तीवरून वरील मुद्दा अधिक स्पष्ट होईल.

१. पहिलें अधिवेशन—१३,१४ जाने, १९२३. स्थळ—उमरावती,
अध्यक्ष—कै. श्री. कृ. कोल्हटकर.
स्वागताध्यक्ष—कै. दामोदर केशव ओक

२. दुसरें अधिवेशन—१९,२० एप्रिल १९२४. स्थळ—उमरावती,
अध्यक्ष—कै. या. मा.काळे.

३. तिसरें अधिवेशन—१७,१८ जाने. १९२६. स्थळ—यवतमाळ.
अध्यक्ष—कै. न. चिं. केळकर
स्वागताध्य—लो. ना. माधव श्रीहरि अणे

४. चौथें अधिवेशन—१०,११ जून १९२७. स्थळ—हैद्राबाद
अध्यक्ष—कै. चिं. वि. वैद्य.
स्वागताध्यक्ष—न्या. कै. केशवराव कोरटकर

५. पांचवें अधिवेशन—२५,२६नोव्हें.१९२८.स्थळ-जळगांव पूर्वखानदेश.
अध्यक्ष—कै. न्यामूर्ति केशवराव. कोरटकर
स्वागताध्यक्ष—कै. के. म. शेनाळकर

६. सहावें अधिवेशन—७,८ सप्टें. १९२९. स्थळ—नागपूर,
अध्यक्ष—कै. दादासाहेब खापर्डे.
स्वागताध्यक्ष—म. म. कृष्णशास्त्री घुले

७. सातवें अधिवेशन–२१,२२ ऑगस्ट १९३७. स्थळ–अमरावती,

अध्यक्ष–प्रा. न. र. फाटक

स्वागताध्यक्ष–प्रा. वि. मि. कोलते

३० मार्च १९४५. स्थळ–अकोट

" विदर्भ साहित्य संघ पुनरुज्जीवन समारंभ "

अध्यक्ष–श्री. नारायण व्यंकटेश ऊर्फ नानासाहेब देशमुख

८. आठवें अधिवेशन–३१ मार्च १९४५. स्थळ–अकोट,

अध्यक्ष–डॉ. य. खु. देशपांडे

स्वागताध्यक्ष–श्री. दादासाहेब टवलारे

९. नववें अधिवेशन–२३,२४,२५ डिसें. १९४६. स्थळ–दर्यापूर,

अध्यक्ष–प्रा. श्री. ना. बनहट्टी

स्वागताध्यक्ष–रा. बाबासाहेब सांगळोदकर, पाटील

१०. दहावें अधिवेशन–२५,२६,२७ डिसें. १९४६. स्थळ–पुसद,

अध्यक्ष–रा. पु. य.देशपांडे

स्वागताध्यक्ष–डॉ. माधव गोपाळ देशमुख

११. अकरावें अधिवेशन–४,५,६ नोव्हें. १९४८. स्थळ–गोंदिया,

अध्यक्ष—डॉ. वि. भि. कोलते.

स्वागताध्यक्ष–राजे प्रतापसिंगराव भोसले

५ नोव्हेंबर १९४८, स्थळ–गोंदिया

" रौप्यमहोत्सव " समारंभ

अध्यक्ष–ना. लो. ना. माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे

वरील आराखड्यावरून हें लक्षांत येईल की, गेल्या २५ वर्षांत संमेलनांची संख्या मात्र ११ भरते. " वि. सा. संघ रौप्य महोत्सव " प्रसंगीं भरणारें ११ वें अधिवेशन सोडून उरलेल्या बाकी दहा अधिवेशनांत विशेष महत्त्वाचे असे खालील ठराव झाले आहेत.

संमेलनांतील ठराव

अधिवेशन पहिलें—' विदर्भ साहित्य संघ ' स्थापन करावा, असा प्रथम ठराव होऊन, त्यासाठी दुसऱ्या ठरावान्वयें एक सुटसुटीत घटना मंजूर करण्यांत आली. घटनेंत पहिल्याच कलमांत ' विदर्भ ' या शब्दाची अशी व्याप्ति ठरविण्यांत आली–" वऱ्हाड, खानदेश, मराठी मध्यप्रांत व निजाम राज्याचा मराठी भाग. " घटनेच्या दुसऱ्या कलमांत–" या संघाच्या कक्षेंत असलेल्या प्रदेशांतील प्राचीन व अर्वाचीन वाङ्मयाच्या सर्व शाखांचें संशोधन, संरक्षण, संवर्धन, प्रसिद्धि व चर्चा करणें–" असा उद्देश देण्यांत आला होता. या घटनेला " संघाच्या पहिल्या परिषदेंत पास झालेले संघाचे नियम " असा मथळा देण्यांत आला होता.

अधिवेशन दुसरें:—मध्यप्रांत सरकारने दुय्यम शाळांमधून इंग्रजीखेरीज इतर विषय देशी भाषांच्या द्वारें शिकविण्याची पद्धत सुरू केल्याबद्दल सरकारचें अभिनंदन. नागपूर विद्यापीठाच्या स्थापनेबद्दल समाधान व्यक्त करून 'अभ्यास-क्रमांत प्रथमपासून अखेरपर्यंत मराठी भाषा व वाङ्मय यांचा समावेश करून त्यांच्या अध्यापनाची तरतूद ' करण्यासंबंधी मागणी. निजाम सरकारच्या राज्यांत दुय्यम शिक्षण मराठीद्वारा देण्याची मागणी.

अधिवेशन तिसरें:—वैदर्भी भाषेंत रूढ असलेल्या शब्दप्रयोगांचा व भाषाप्रयोगांचा लेखकांनी शक्य तों आपल्या लेखनांत उपयोग करावा! संघाच्या प्रत्येक सभासदाने व मराठी भाषेच्या प्रत्येक अभिमान्याने आपला सर्व व्यवहार मराठींतूनच करावा!

अधिवेशन चौथें:—या अधिवेशनांत निजाम इलाख्यांतील साहित्य, शिक्षण, मतस्वातंत्र्य, वाङ्मयप्रसार यांबाबत होणारा अन्याय, शिक्षणक्षेत्रांत मराठी व इतर देशी भाषा यांची गळचेपी, अनेक विख्यात वृत्तपत्रें व पुस्तकें यांवरील बंदी इत्यादि विषयांसंबंधांत ठराव मंजूर करण्यांत आले.

अधिवेशन पांचवें:—वि. सा. संघाने खानदेशच्या इतिहासाचीं साधनें प्रकाशित करण्याचें काम हातीं घ्यावें.

अधिवेशन सहावें:—या अधिवेशनांत ठरावांची संख्या बरीच फुगली—विशांपर्यंत गेली! याशिवाय विशेष उल्लेखनीय असें कांही दिसत नाही.

अधिवेशन सातवें:—या अधिवेशनांत मंजूर झालेल्या १६ ठरावांपैकीं बारा ठराव भाषाविषयक व शिक्षणविषयक सार्वजनिक प्रश्नासंबंधींचे आहेत. एका ठरावांत भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार करण्यांत आला आहे! दुसऱ्या एका ठरावांत वि. सा. संघाचें मुखपत्र म्हणून एक त्रैमासिक सुरू करावें असें म्हटलें आहे.

कांही इतर कार्यें

सन १९२३ ते १९२९ या काळांत संमेलनाशिवाय हस्तलिखित ग्रंथांच्या संग्रहाचें व नूतन ग्रंथ प्रकाशनाचें कार्यहि वि. सा. संघाने शिरावर घेतलें होतें. या योजनेप्रमाणे बरींचशीं हस्तलिखितें जमा झालींहि होतीं. आज मात्र तीं संघा-जवळ नाहीत. संघाने ' विदर्भ साहित्य संघ माला ' नांवाची एक प्रकाशन-योजनाहि आखली होती. या मालेतर्फे यवतमाळचे डॉ. य. खु. देशपांडे यांचें ' महानुभावीय मराठी वाङ्मय ' हें संपादित पुस्तक पुरस्कृत झालें होतें. कै. या. मा. काळे यांचें ' शशिलेना ' हें काव्यहि दुसरें पुष्प म्हणून निघणार होतें, पण तें जमलें नाही.

विदर्भ साहित्य संमेलन प्रसंगीं अमरावती, भागानगर (द. हैदराबाद), यवतमाळ, पुसद या ठिकाणीं ऐतिहासिक कागदपत्रांचें व हस्तलिखित ग्रंथांचें प्रदर्शनहि भरविण्यांत आलें होतें. यवतमाळच्या ' शारदाश्रमा 'चें या बाबत संघाला जें वेळोवेळीं सहकार्य मिळालें तें उल्लेखनीय आहे.

वर उल्लेखिलेलें संघाचें सातवें अधिवेशन म्हणजे अमरावती येथे भरलेलें १९३७ मधील अधिवेशन. त्यानंतरचीं संमेलनें म्हणजे १९४४ मध्ये वि. सा. संघाचें जें पुनरुज्जीवन करण्यांत आलें, त्यानंतरचीं अधिवेशनें होत. वि. सा. संघाच्या पुनरुज्जीवनानंतरचा इतिहास एक तर ताजा आहे आणि दुसरें म्हणजे दर वर्षी वि. सा. संघाने अहवाल व ठराव स्वतंत्रपणें प्रसिद्ध केले आहेत. म्हणून पुनरुज्जीवनानंतरच्या वि. सा. संघाच्या कार्याचा साकल्याने जर एक थोडक्यांत आढावा घेतला, तर त्यांत प्रमुख ठरावांचाहि समावेश होईल. तेव्हा तेंच आता करतों.

पुनरुज्जीवनानंतर

अमरावतीच्या अधिवेशनांत (१९३७) दर्यापूरकरांनी निमंत्रण दिलें. परंतु अनेक अडचणींमुळे तेथे संमेलन भरूं शकलें नाही. अमरावतीच्या अधिवेशनांत कार्यकारी मंडलाची जी निवडणूक झाली, तींत लो. ना. बापूजी अणे अध्यक्ष व रा. अ. तु. वाळके हे सरचिटणीस निवडले गेले होते. त्यानंतर अनेक अपरिहार्य अडचणींमुळे स्थगित झालेलें वि. सा. संघाचें कार्य पुन: १९४४ मध्ये सुरू होण्याचा योग आला. हा पुनरुज्जीवन समारंभ ३० मार्च १९४५ रोजीं अकोट (जि. अकोला) येथे एलिचपूरचे श्रीमंत नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं अत्यंत उत्साहाने साजरा होऊन, डॉ. य. खु. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली तेथेच ८ वें अधिवेशन भरल्याचा वर उल्लेख आलाच आहे. त्यानंतर दरवर्षी (अकोट) दर्यापूर, पुसद अशा तालुक्यांच्या ठिकाणीं वि. सा. संघाचीं पुढील अधिवेशनें फारच उत्साहाने भरलीं. मध्यंतरीं राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा अमानुषपणें वध झाल्यामुळे, सर्व राष्ट्रावरच जो वज्राघात झाला, त्यामुळे पुसदनंतर भरणाऱ्या गोन्दियाच्या अधिवेशनांत थोडें अधिक अंतर पडलें. परंतु या संमेलनप्रसंगीं साजरा होत असलेला " रौप्य महोत्सवा " चा आलेला योग पाहून, त्यांतल्यात्यांत मनाला थोडें समाधान वाटतें.

१९४४ नंतर आजपर्यंत वि. सा. संघाने केवळ संमेलनें भरवून ठराव मंजूर करण्याचेंच कार्य केलें असें नाही. वि. सा. संघाने या चार वर्षांच्या अल्पावधींत बरीच कामगिरी केली. अकोट संमेलनांत प्रथम एक ' घटनासमिति ' स्थापन करण्यांत आली व तिच्याकरवीं वि. सा. संघासाठी अत्यंत आवश्यक असलेली घटना तयार करून घेण्यांत आली. १८६० च्या २१ व्या कलमान्वयें ता. २-८-१९४५ रोजीं वि. सा. संघ ही संस्था सरकारांत रजिस्टर करून घेण्यांत आली. याप्रमाणे वि. सा. संघाचीं नित्य व नैमित्तिक कार्यें नियमितपणें व रीतसर सुरू झालीं. वि. सा. संघाच्या सध्याच्या नवीन घटनेप्रमाणे संघ व संमेलन यांचा एकजीव करण्यांत आला आणि म्हणूनच सध्या संघाध्यक्ष तेच संमेलनाध्यक्ष असें घटनेचें वैशिष्टय होऊन बसलें. या घटनेप्रमाणे पहिली निवडणूक होऊन, दर्यापूर येथे पहिलें (घटनेनुसार) संमेलन भरलें. संमेलनें, त्यांत मंजूर झालेले ठराव, त्यांची

अंमलबजावणी इत्यादि कामें आतापर्यंत अगदी पद्धतशीरपणें झालीं. या चार वर्षांत मराठी भाषाविषयक, शिक्षणविषयक, संशोधनविषयक अनेक ठराव वेळोवेळीं मंजूर करण्यांत आले. भाषाधार प्रांतरचना व नागपूर नभोवाणी केन्द्र याहि संबंधांत वि. सा. संघाने जोराची मागणी केली आहे.

कांही उपसमित्या

संमेलनांत मंजूर झालेल्या ठरावांच्या अंमलबजावणीकरिता वि. सा. संघाने वेळोवेळीं निरनिराळ्या उपसमित्या नेमल्या, प्रांतांतील अनेक वजनदार साहित्यिकांची व मराठी भाषाभिमानी कार्यकर्त्यांची मदत घेतली आणि योजलेल्या कार्यांत सातत्य ठेवलें. या उपसमित्यांत शुद्धलेखन समिति, जनता-वाङ्.मय-संग्रह समिति, सुलभ वाङ्.मय समिति, साक्षरताप्रसार समिति, आगरकर चरित्र वाङ्.मय समिति, शासनभाषा समिति, परीक्षा समिति, संस्कृत ग्रंथ समिति इत्यादि समित्या प्रमुख होत. या सर्व उपसमित्यांचें कार्य डोळ्यांत भरण्यासारखें व्हावयाला लेखन-सहाय्याबरोबर निधिसहाय्याचीहि किती आवश्यकता आहे, हें नव्याने सांगावयाला नको. पण प्रांतिक सरकारने व प्रांतांतील मराठी भाषाभिमानी धनिकांनी वि. सा. संघाला मदत करावयाचें ठरविल्यास अशक्य तें काय आहे ? याच ठिकाणीं प्रांतिक सरकारने १९४७ सालाकरिता रु. १००० ची देणगी वि. सा. संघाला दिली आहे या गोष्टीचा साभार उल्लेख केल्यावाचून राहवत नाही. हीच देणगी थोडी वाढवून दरवर्षी प्रांतिक सरकारने वि. सा. संघाला, म्हणजेच पर्यायाने या प्रांतांत प्रमुखपणें पसरलेल्या मराठी भाषेच्या संवर्धनाला व प्रचाराला, मदत करावी अशी प्रांतिक सरकारला वि. सा. संघाची आग्रहाची विनंती आहे. प्रांतांतील धनिकांनीहि प्रांतिक सरकारचें अनुकरण करण्यासारखें आहे, असें कोण म्हणणार नाही ?

वि. सा. संघाचें मुखपत्र ‘ युगवाणी ’

वि. सा. संघाच्या अकोट संमेलनांत संघाचें मुखपत्र म्हणून एक मासिक काढावें असा ठराव मंजूर झाला होता. त्यानंतर त्या दृष्टीने तावडतोब कामाला सुरवात झाली. या मासिकाचें नांव ‘ युगवाणी ’ असें ठेवावें असें ठरलें आणि सुप्रसिद्ध वैदर्भीय साहित्यिक व टीकाकार यवतमाळचे रा. वामन नारायण देशपांडे यांच्या हातीं संपादकीय सूत्रें सोपविण्यांत आलीं. या मासिकाचें प्रकाशन एक वर्ष-भर वि. सा. संघाने केलें. या कठिण दिवसांत मासिक चालवावयाचें—विशेषतः निधीचें पाठबळ नसतांना चालवावयाचें—म्हणजे कोण कठिण काम ! तरी पण सर्व आपत्तींना तोंड देऊन वि. सा. संघाने १९४६ सालीं वर्षभर अंक प्रसिद्ध केले. अंक चांगले निघाले, पण वि. सा. संघावर कर्ज झालें. पण कर्ज काढून ‘ युगवाणी ’ किती दिवस चालणार ? परंतु ऐन वेळीं विदर्भ साहित्य संघाचे एक उत्साही तहा-हयात सभासद रा. द. ना. ठाकूर हे संघाच्या मदतीला धावून आले. ‘युगवाणी’ च्या प्रकाशनाची जबाबदारी त्यांनी आपल्या शिरावर घेतली. त्याप्रमाणे पुसद संमेलनांत ‘ युगवाणी ’ च्या प्रकाशनाची एक नवीन योजना आखण्यांत आली आणि पांच

वर्षांकरिता एक करार करून 'युगवाणी'च्या प्रकाशनाची जबाबदारी रा. द. ना. ठाकूर यांजवर सोपविण्यांत आली. संपादकीय व्यवस्था वि. सा. संघाकडे राहून, 'युगवाणी' हें संघाचें मुखपत्र म्हणूनच गेलीं दोन वर्षें व्यवस्थित प्रकाशित होत आहे. वि. सा. संघाच्या या मुखपत्राला प्रांतांतील सर्व मराठी भाषाभिमानी सुशिक्षितांनीं सक्रीय सहानुभूति दर्शवावी अशी विनंती आहे.

परीक्षा समिति

वि. सा. संघाच्या 'परीक्षा समिती'चा स्वतंत्रपणें उल्लेख केला पाहिजे. मराठी भाषा आणि साहित्य यांच्या अभ्यासाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाने ता. १८-८-४६ च्या सभेंत खास ठराव करून 'वाङ्मयविषयक परीक्षा' घेण्याचें ठरविलें. या कामासाठी एक स्वतंत्र 'परीक्षा समिति' नियुक्त करण्यांत आली. या परीक्षा समितीवर प्रांतांतील ठिकठिकाणचे थोर साहित्यिक व शिक्षणतज्ज्ञ आहेत. या परीक्षा समितीचे प्रमुख म्हणून वि. सा. संघाचे माजी अध्यक्ष प्रा. श्री. ना. बनहट्टी यांना नियुक्त करण्यांत आले. या परीक्षा समितीचें कार्य प्रा. बनहट्टी यांनी त्यांच्या नेहमीच्या कार्य पद्धतीप्रमाणे अत्यंत व्यवस्थितपणें गेल्या दोन वर्षापासून चालविलें आहे. प्रांतांतील ठिकठिकाणच्या शिक्षणसंस्थाचें व कार्यकर्त्यांचें परीक्षा समितीला सहकार्य मिळत आहे. पण तें जितकें वाढेल तितकें कार्य अधिक सुलभ होईल यांत शंका नाही. परीक्षा समितीने अभ्यासक्रम व परीक्षांचे नियम तयार केले आहेत. आतापर्यंत तीन परीक्षा झाल्या. प्रांतांतील सर्व विद्यार्थ्यांनी व व शिक्षकांनी मातृभाषेच्या अभ्यासाची ही सुवर्णसंधि गमावूं नये अशी आग्रहाची विनंती आहे. वि. सा. संघातर्फे 'परीक्षा समिती'चा अहवाल स्वतंत्रपणें प्रसिद्ध होईल.

आर्थिक सहाय्य आणि आभार

विदर्भ साहित्य संघावरील कर्जाचा वर उल्लेख आलाच आहे. 'युगवाणी'चें प्रकाशन संघाच्या शिरावर होतें तेव्हा तेव्हाचे संघाध्यक्ष प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी वेळोवेळीं झीज सोसून संघांतील उत्साहाचें वातावरण कायम ठेवलें. गेल्या दोन वर्षांत निवडून आलेल्या का. मं. च्या सभासदांनी कर्जफेडीची आपली जबाबदारीहि जाणली. विशेषतः या वर्षी (१९४८) कर्जफेडीचा भार बराचसा कमी झाल्याचें समाधान का. मं. ला लाभलें आहे. अमरावतीच्या, डॉ. वि. भि. कोलते यांच्या अध्यक्षतेखालीं कार्य करणाऱ्या, 'विदर्भ नाट्य मन्दिरा'ने वि. सा. संघ पुनरुज्जीवित करावयाला तर मदत केलीच; पण त्याबरोबरच वि. सा. संघाला आर्थिक मदतहि जिव्हाळ्याने केली. या वर्षी (१९४८) आपल्या 'आग्र्याहून सुटका' या नाटकाचे
 अमरावतीला एक व नागपूरला एक असे दोन प्रयोग करून विदर्भ नाट्य-मन्दिराने

वि. सा. संघाला जवळ जवळ ६०० रुपयांची मदत केली आहे. आर्थिक मदतीच्या बाबतीत वि. सा. संघाचे हितचिंतक व तहाह्यात सभासद, प्रांतिक सरकार व विदर्भ नाट्य-मन्दिर या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक मी वि. सा. संघातर्फे आभार मानतो. वि. सा. संघाचे सर्व सभासद, संमेलनें घडवून आणणारीं स्वागतमंडळें, प्रांतांतील सर्व मराठी वृत्तपत्रांचे संपादक, शिक्षणसंस्थांचे चालक यांहि सर्वांचा साभार उल्लेख केला पाहिजे.


साहित्यिकांचा सत्कार

गेल्या चार वर्षापासून वि. सा. संमेलनप्रसंगीं प्रांतांतील जुन्या पिढींतील थोर व प्रथितयश साहित्यिकांचा सत्कार करण्याची योजना वि. सा. संघ आखीत होता. परंतु या ना त्या कारणाने या योजनेला मूर्तस्वरूप येऊं शकलें नाहीं. यंदा मात्र "रौप्य-महोत्सव" प्रसंगीं हा 'सत्कार-समारंभ' घडून येण्याचा योग येत आहे याबद्दल संघाला धन्यता वाटणें साहजिक आहे.

यंदाचा "रौप्य-महोत्सव"

वि. सा. संघाचा 'रौप्य-महोत्सव' गोन्दिया येथे बिहारचे गव्हर्नर ना. लो. ना. माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होत आहे. ना. अणे यांचा आणि वि. सा. संघाचा अत्यंत निकटचा आणि जिव्हाळ्याचा संबंध. त्यांचा साहित्यक्षेत्रांतील अधिकारहि महत्त्वाचा. कर्तृत्व तर फारच विशाल! तेव्हा 'रौप्य-महोत्सव' आणि 'महोत्सवाध्यक्ष' हा 'समसमा संयोग' शुभसूचकच समजला पाहिजे. वि. सा. संघाची पुढली आघाडी जोरकस ठरावयाला ना. अणे यांचें मार्गदर्शन व आशीर्वाद पूर्ण फलदायक होईल याबद्दल खात्री व्यक्त करून अहवाल आटोपता घेतों.

कै. दादासाहेब खापर्डे



नागपूर येथील सहाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष (१९२९)

कन्नड कविवर्य प्रा. द. रा. बेंद्रे यांची एक कविता

' उभयान्वयी '

● विख्यात कन्नड कविवर्य प्रा. द. रा. बेंद्रे यांच्या एका सुंदर सुनीताचा परिचय ' उभयान्वयी ' यांनी या टिपणवजा लेखांत करून दिला आहे.

सुप्रसिद्ध कन्नड कवि प्रा. द. रा. बेन्द्रे यांचें देवनागरींत लिप्यंतर केलेलें मूळ कन्नड सुनीत आणि त्याचा स्वत: कवींनीच केलेला पद्यात्मक मराठी अनुवाद हा सोबत दिलेला आहे. भाषाभगिनींचा संसार जाणून घेण्याचें मराठीने गेल्या कांहीं वर्षांत जे प्रयत्न केले, त्यांतून पुष्कळदां वाचकांना प्रा. बेन्द्रे यांच्या साहित्यसेवेचा परिचय झालेला आहे.

प्रस्तुत सुनीत ' मौन ' हें त्याच्या मथळ्यावर दिलेल्या अरावदर्शिमांतील ' मदर ' यांच्या ओळींतून निघणाऱ्या कल्पनेशीं निगडित आहे. या सुनीताची रचना कवींनी २५-५-४८ ला केली. या दिवसाच्या आसपासच्या आठवड्यांत प्रा. बेन्द्रे, प्रा. मुगळी, प्रा. गोकाक प्रभृति सहा साहित्यिक मित्रांनी मौन सप्ताह पाळला होता. त्या ' मौना 'च्या काळांत मौनाविषयीं २०।२२ स्फुट लिखितें प्रा. बेन्द्रे यांच्या लेखणीने ओलविली. त्यांपैकी प्रस्तुत सुनीत हें एक होय.

या सुनीताचें स्वरूप समजण्यासाठी कन्नड भाषा न जाणणाऱ्या वाचकांस दोन-तीन प्राथमिक गोष्टींचा परिचय हवा. त्यांपैकी पहिली म्हणजे मूळ कन्नड लिखिताचें वाचन सुकर होणें ही होय. कन्नड भाषेंत ' ए ' कार दोन आहेत. ऱ्हस्व व दीर्घ, त्यांचा उच्चार मराठी ' ए ' कारापेक्षा अनुक्रमें तोकडा व दीर्घ होतो. त्याचप्रमाणें, शब्दाच्या अंतींचा ' अ ' मराठींत अस्पष्ट उच्चारला जातो, त्यामुळे ' कन्नड ' भाषेंत जो अन्त्य ' अ ' चा स्पष्ट उच्चार होतो तो मराठी श्रोत्यास दीर्घ वाटतो व म्हणून तोहि मराठीच्या दृष्टीने ' अ ' व ' आ ' यांच्या दरम्यानचा उच्चार होय. त्याचप्रमाणे, कन्नड ' ए ' कार व 'ओ' कार यांच्या उच्चारांत ' य ' ' व ' च्या छटा मराठीपेक्षा अधिक स्पष्ट आहेत. या गोष्टी स्पष्ट होण्यासाठी नागरी लिपीने न दाखविल्या जाणाऱ्या उच्चाराच्या खुणा थोड्या निराळ्या पद्धतीने दाखविल्या आहेत. सूत्रमय भाषेंत असें म्हणतां येईल की—

(१) अ < अ. < आ (२) अे < ए < अे. (३) ओ॒ < ओ < ओ.

मराठी सुनीताच्या इतिहासाप्रमाणेच कन्नड भाषेंतहि सुनीत रचनेसंबंधी वेगवेगळे प्रयोग होऊन प्रस्तुत रचना मान्य झाली. या रचनेंत पंचमात्रिक आवर्तनी चतुर्गणी ओळींचा उपयोग केला जातो. उदा.—

स॒ द्दि ल्ल. | सु॒ ळि वि ल्ल. | र॒ वि रा ज. | मू॒ डु वे नु

अष्टपदी किंवा चतुर्दशपदी या नांवांनी कन्नड भाषेंत सुनीत रूढ आहे.

तिसरी गोष्ट म्हणजे मराठी कवितेंत एका ओळीबरोबर, किंवा पूर्ण ओळींतून कल्पना पुर्ण व्हावी, असा संकेत आहे. या संकेताविरुद्ध अशी रचना मराठींत असली, तरी ती मुक्तच्छंदात्मक, किंवा अपवादात्मक, असते. याच्या नेमकी उलट स्थिती कन्नड काव्याची होय. पूर्ण ओळींमध्ये कल्पना पूर्ण करणें हा कन्नड कवितेंतील अपवाद होय. ओळींच्या अंतीं शब्दहि पूर्ण झालाच पाहिजे, असें बंधन नाहीं.

मुनीतापुरतें असें बंधन इतर कन्नड कवींनीं पाळलें असलें, तरी प्रा. बेन्द्रे यांनी तें पाळलेलें नाही. कन्नडमध्ये शब्दयति नसून अर्थयति मात्र आहे. म्हणून वस्तुत: कन्नड सुनीत म्हणजे, लेखन-मुद्रण सुनीतात्मक, पण अर्थदृष्ट्या रचना मुक्तच्छंदात्मक, अशी स्थिति आहे. अर्थदृष्ट्या प्रा. बेन्द्रे यांच्या सुनीताचें (मराठी) लेखन पुढीलप्रमाणें होईल:—

ना शब्द, नच गाजावजा
रविराज ये उदयाचळीं, उजळे दिशा अन् मावळे
आलस्य सारें झाडुनी मौन हे मोकळे की (जणु) कल्लोलमालासागरीं......
...निरतसीनापालनीं

ती बघ तिथे मेघावली—धो धो न कांही विरघळे, वरि सातरंगी खोडुनी
ज्योत्स्ना कशीं वर्षे निर्झी
आकाशिं षड्ऋतुहि फिरे नौका जणू जलिं संचरे
त्या पर्वतीं-शिखरीं-शिरीं कोठे तरी सुम दरवळे
मुळि बोल कोणाला हवे !
योकडे हसुं वाकडे बघणेंहि ती केकावली हर्षांतली, जणु भूक फुंके शिंग की
एक पोटींचे उमाळे, एक हृदयीं मावले
का-न होई रे सख्या, ती नादमाता बोलते
बोल हे परि मूल मौनाचिया ओटींतले
मौन प्रतिमा बोलते बोलासि मौनाचे दैव रे.

वरील पुनर्लेखनावरून वाचकांना कल्पना येईल की, सुनीतांतील पहिल्या आठ ओळींतून आरंभीं - अंती मौनाची कल्पना सांगितलेली असून मध्ये निसर्गाच्या मौनपालनाचीं उदाहरणें देण्यांत आलीं आहेत. सुनीतांतील पुढील चार ओळींतून बालकाच्या (मानवाच्या) मौनाची कल्पना देण्यांत आली आहे आणि शेवटच्या द्विपदींत मौन-बोल यांचा संबंध स्पष्ट करण्यांत आला आहे.

प्रस्तुत सुनीतांतील कल्पना अगदी अपरिचित नसली, तरी तिच्या तत्त्वज्ञानात्मक पिंडामुळे व विषमालंकारयुक्त मांडणीमुळे थोडी कठीणच वाटणारी आहे. आपापलें कार्य निःशब्दपणें करणारे रविराज, सागर, ज्योत्स्ना, मेघावली षड्ऋतु आणि सुम यांचीं (निसर्गांतील) उदाहरणें कवीची कल्पना साकार करण्याचा प्रयत्न करतात. आणि, बालकाचें अनिमित्तहास, अपांगदृष्टि इत्यादींतून त्यांचें मनोगत जाणणाऱ्या मातेचें चित्र ही मौनाची महती अधिक पटवितें, म्हणून कवींचा निर्णय असा की, बोल हे मौनाची प्रतिमा होत.

प्रा. बेंद्रे यांचें मूळ कन्नड सुनीत असें:—

मौन

" Words are only a support for a sponteneous mutual understanding. " — The Mother

सादिल्ल., सुळिविल्ल.; रविराज. मू.डुवनु
बेंळगुवनु अडगुवनु. बे.सॆल्लवनू डि
मौन. मोरॆयिडुवन्ते कडलु तॆरे तॆरे दाडि
मर्यादॆ मी.रदिदॆ. अगो अल्लि मो.डवनु
ऎल्लो सुम्मने सुरिदु इद्दुदु बिल्लनु कू.डि;
निश्शॆय कौमुदि; बा.न बयल गडालिन नौकॆ
आ.रुकालकुते.लि; मलॆयजडॆयलि मू.डि
सू.सि सौसव.; इरवे! मातु बे. के. ऎकॆ!
हुसिनगॆयु, कुडिनो.ट., हिग्गु हिग्गिन. के.कॆ
मरुळाट., अळुवु हसिविन. कू.गु, दनिमो.डि
ऒन्दॆ बसरिन. बदुकु ऒन्दॆ हृदयवनी.डि
तणियवे.! श्रुतियागु— नादमातृकॆ आ.कॆ
कू.सुमातिगॆ मौन. ता.यिमडिलु सदैव.
मा.तु मौनदप्रतिमॆ, मौन. मातिनदैव.

या कन्नड सुनीताचें खुद्द प्रा. बेंद्रे यांनीच मराठींत केलेलें रूपांतर असें:—

मौन

ना शब्द, नच गाजावजा; रविराज ये उदयाचळीं
उजळे दिशा अन् मावळे. आलस्य सारे झाडुनी
मौन की हे मोकळे कल्लोल माला सागरीं
निरतसीमा पालनी, ती बघ तिथे मेघावली
धो धो न कांही विरघळे, वरि सातरंगी खोउनि
ज्योत्स्ना कशी वेँ निशीं; आकाशिं षड्ऋतुही फिरे,
नौका जणू जलिं संचरे; त्या पर्वतां–शिखरीं–शिरीं
कोठे तरी सुम दरवळे; मुळि बोल कोणाला हवें!
थोकडे हसु, वाकडे बघणेंहि, ती केकावली
हर्षांतली, जणु भूक फुंके शिंग कीं—

एक पोटींचे उमाळे एक हृदयीं मावले
कान होई रे सख्या, ती नादमाता बोलते
बोल हे परि मूल बा मौनाचिया ओटींतले
मौन प्रतिमा बोलते, बोलाशि मौनाचे दैव रे

कै. श्री. कृ. कोल्हटकर



उमरावती येथील पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष

(१९२३)

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी
सरचिटणीस,
वि. सा. संघ यांजकडून

विदर्भ साहित्य संघ, अमरावती

१९४७ सालचा अहवाल

विदर्भ साहित्य संघाचा १९४६ सालचा सविस्तर अहवाल पुसद येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या दहाव्या अधिवेशनाच्या वेळीं सभासदांना सादर करण्यांत येऊन, ' युगवाणी ' च्या ऑक्टोबर ४७ च्या अंकांत प्रसिद्धहि करण्यांत आला होता. त्यांत पुसदच्या विदर्भ साहित्य संमेलनापर्यंतचा सर्व वृत्तांत आलाच आहे. त्यानंतरचा सर्व वृत्तांत या अहवालांत समाविष्ट करण्यांत येत आहे.

पुसदचें विदर्भ साहित्य संमेलन

वर उल्लेखिलेलें विदर्भ साहित्य संमेलनाचें दहावें अधिवेशन पुसद (जि. यवतमाळ) येथे ता. २५, २६ व २७ डिसेंबर १९४६ या दिवशीं अत्यंत उत्साहानें व यशस्वी रीतीने पार पडलें. या संमेलनाचें अध्यक्षस्थान नवीन निवडून आलेले संघाध्यक्ष सुप्रसिद्ध वैदर्भीय साहित्यिक, कादंबरीकार व वृत्तपत्रकार रा. पु. य. देशपांडे यांनी मंडित केलें होतें. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष या प्रांतांतील विद्वान् प्राध्यापक डॉ. माधव गोपाळ देशमुख हे होते. या संमेलनाचें उद्‌घाटन वऱ्हाडचें भीष्माचार्य वीर वामनराव जोशी यांच्या हस्तें झालें. या संमेलनाचा हा विशेष होता कीं, महाविदर्भांतील साहित्यिकांचा व साहित्यभक्तांचा फार मोठा मेळावा पुसद मुक्कामीं जमला होता.

या संमेलनाच्या कार्यक्रमाला ' हस्तलिखितांच्या प्रदर्शनांच्या उद्‌घाटना ' ने झालेली सुरवात शुभसूचकच ठरली. हें उद्‌घाटन या प्रांतांतील सुप्रसिद्ध संशोधक व विद्वान् प्राध्यापक श्री. वि. भि. कोलते यांच्या हस्तें झालें. या संमेलनप्रसंगीं वीर वामनराव जोशी, रा. पु. य. देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख व प्रा. वि. भि. कोलते या सर्वांचींच भाषणें त्यांच्या त्यांच्या विद्वत्तेंत व कीर्तींत भर घालणारींच झालीं. हीं सर्व भाषणें वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालींच आहेत.

पुसद संमेलनाचे कांहीं विशेष

पुसद संमेलनप्रसंगीं तेथील सार्वजनिक वाचनालयाचा, प्रा. ना. सी. फडके यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडलेला हीरक महोत्सव, ' चित्र, शिल्प, नाट्य, नृत्य, संगीत व शब्द यांपैकीं व्यक्तिमनावर परिणाम करणारी कला कोणती ? ' या विषयावरील अत्यंत मनोवेधक व उद्‌बोधक परिसंवाद, व्याख्यानमाला इत्यादि या संमेलनाचे विशेष म्हणून सांगतां येतील. या संमेलनाच्या वेळीं या प्रांतांतील दोन विद्वान् व व्यासंगी लेखक वर्धेचे प्रा. वा. कृ. चोरघडे व अमरावतीचे प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांना अनुक्रमें ३०० रुपयांचें ' सरस्वतीबाई देशमुख पारितोषिक ' व ' वैदर्भी रीति ' या निबंधाबद्दल स्वागत मंडळाने ठेवलेलें १०० रु. चें रोख पारितोषिक अध्यक्षांच्या हस्तें देण्यांत आलें.

या संमेलनाने ता. २७ रोजीं खुल्या अधिवेशनांत जे ठराव सर्वानुमतें मंजूर केले, ते संख्येने नसले तरी महत्त्वाच्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. त्यांतल्यात्यांत नभोवाणी केन्द्र, नागपूर, तसेंच सागर विद्यापीठ व मराठी विदर्भांतील असंशोधित विभागाचें संशोधन, प्रांतिक सरकारांत 'साहित्य व कला' हें खातें इ. विषयांवरील ठराव विशेष उल्लेखनीय आहेत.

पुसदचें हें दहावें अधिवेशन अपूर्व उत्साहाने पार पाडल्याबद्दल स्वागत मंडळाचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच होतील. विशेषत: डॉ. मा. गो. देशमुख, रा. शंकरराव सरनाईक, रा. गोधाजीराव मुखरे, डॉ. सरनाईक, रा. पांडे, रा. बळिरामपंत एकबोटे, रा. शुक्ल आणि त्यांचे सर्व सहकारी कार्यकर्ते यांचे विशेष गौरवाने आभार मानले पाहिजेत.

अहवालवर्षी झालेल्या निवडणुकीच्या वेळीं मतदानास पात्र असलेल्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे होती. यांत १९४५ व ४६ सालच्या बाकीदार असलेल्या सभासदांचा समावेश करण्यांत आला नाही.

१. हितचिंतक सभासद (२५० रु. देणारे)	...१
२. तहाहयात सभासद (१०० रु. देणारे)	...५
३. साधारण सभासद वर्ग पहिला (वा. व. ५ रु. देणारे)	...११७
४. साधारण सभासद वर्ग दुसरा (वा. व. २ रु. देणारे)	...१५०
एकूण	२७३

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाच्या सभा

अहवालवर्षी विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाच्या २५-१२-४६, ४-२-४७, ३१-७-४७, १६-११-४७, २४-१-४८ व २२-२-४८ या तारखांना एकूण सहा सभा झाल्या. यांपैकी पहिल्या सभेचा उल्लेख गेल्या अहवालांत न आल्यामुळे, आणि गोन्दिया (मध्यप्रांत) येथे ठरलेलें १९४७ चें विदर्भ साहित्य संमेलन नियोजित वेळीं न होऊं शकल्यामुळे शेवटल्या दोन अधिक सभांचा या अहवालांतच समावेश केला आहे. यांत संमेलनाचे ठराव, संघाचीं नित्य आणि नैमित्तिक कार्यें, संघावर, 'युगवाणी'च्या प्रकाशनाच्या जबाबदारीमुळे, झालेल्या कर्जाची फेड, विदर्भ साहित्य संमेलन, १९४७ ची निवडणूक इ. बाबतींत महत्त्वाचे निर्णय घेण्यांत आले. या सर्व सभांचा वृत्तान्तहि 'युगवाणी'त प्रसिद्ध होणाऱ्या संघवार्तेत समाविष्ट करण्यांत आलाच आहे. मात्र ता. २५-१२-४६ च्या सभेंत कार्यकारी मंडळाने विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' मासिकाच्या कायम स्वरूपाच्या प्रकाशन-व्यवस्थेबाबत जो निर्णय घेतला त्याचा स्वतंत्र उल्लेख केला

' युगवाणी 'ची नवीन व्यवस्था

ता. २५-१२-४६ च्या सभेंत अमरावतीचे रा. द. ना. ठाकूर यांच्याशीं, ' युगवाणी ' बाबत कार्यकारी मंडळानें करावयाच्या कराराचा मसुदा मंजूर करण्यांत आला. या करारान्वयें ' युगवाणी 'च्या प्रकाशनावर देखरेख राहून, संघाची ' युगवाणी 'च्या प्रकाशनाबाबत काळजीहि दूर झाली. वि. सा. संघानें रा. वा. ना. देशपांडे यांच्यासारख्या सुप्रसिद्ध साहित्यिकाची संपादकाच्या जागीं निवड केली, रा. द. ना. ठाकूर यांनीहि सर्व प्रकारची झीज सोसून ' युगवाणी 'च्या प्रकाशनांत आपलें चित्त ओतलें; आणि त्यामुळे अहवालवर्षी ' युगवाणी 'च्या प्रकाशनाचें कार्य सुव्यवस्थितपणें चाललें. वि. सा. संघानें रा. द. ना. ठाकूर यांच्याशीं पांच वर्षांचा करार केला असून, यंदाच्या अनुभवावरून पांच वर्षांत ' युगवाणी 'ची उत्तरोत्तर भरभराटच होत जाईल, याबद्दल आम्हांला शंका वाटत नाहीं !

" सुलभ वाङ्मय समिति " आणि " आगरकर चरित्र पारितोषिक समिति. "

विदर्भ साहित्य संघाच्या १९४६ सालच्या अहवालांत वरील दोन समितींच्या कार्याचा आढावा देण्यांत आला होताच. अहवालवर्षीं पुरेसा निधीचा व लेखन-सहाय्याचा अभाव आणि इतरहि कांहीं अपरिहार्य कारणामुळे या दोन समितींचें फारसें कार्य होऊं शकलें नाहीं. हें कार्य यापुढे सुव्यवस्थितपणें पार पडण्यासाठीं वि. सा. संघानें कार्यक्षम योजना आखण्याचें काम हातीं घेतलें आहे. या योजने-नुरूप वरील कार्य शक्य तों लवकर मूर्तस्वरूपास येईल असा संघाला विश्वास वाटतो.

शाखा--सभा--शासन--समिति

विदर्भ साहित्य संघानें कार्यकारी मंडळाच्या ता. ८-९-४७ च्या सभेंत वि. सा. संघाच्या कार्याचा प्रांतांत सर्वत्र प्रचार व्हावा यासाठीं, का. मं. चे सभासद रा. अ. वि. माटोडकर यांना आमंत्रक नेमून, एक ' शाखा-सभा-शासन-समिति ' स्थापन केली. या समितीतर्फे बुलडाणा जिल्ह्यांत संघाची एक शाखा अहवालवर्षी स्थापन झाली. या शाखा सभेनें अहवालवर्षी वि. सा. संघाच्या कार्याला बुलडाणा जिल्ह्यांत फारच जोराची चालना दिली. ' बुलडाणा जिल्हा शाखा सभे 'नें वि. सा. संघाच्या परीक्षा समितीला जें हार्दिक सहकार्य दिलें तेंहि उल्लेखनीय आहे.

गोन्दियाचें विदर्भ साहित्य संमेलन स्थगित

पुसद येथे भरलेल्या का. मं. च्या सभेनें निमंत्रण स्वीकारून, गोन्दिया येथे विदर्भ साहित्य संमेलनाचें ११ वें अधिवेशन भरविण्याचें निश्चित केलें होतें. तेथील स्वागत मंडळानें जोराची तयारीहि सुरू केली होती. वृत्तपत्रांत गोन्दियाच्या विदर्भ साहित्य संमेलनाबाबत जो वृत्तान्त वेळोवेळीं प्रसिद्ध झाला, त्यावरून स्वागत मंडळानें चालविलेल्या कार्याची सहज कल्पना येण्यासारखी आहे.

राष्ट्रावरील भयंकर आपत्ति

परंतु ता. ३०-१-४८ रोजीं राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा अमानुषपणें वध होऊन, सर्व राष्ट्रावर जो वज्राघात झाला त्यामुळे सर्व राष्ट्रांतीलच उत्साह मावळला, तेथे विदर्भ साहित्य संघ अथवा गोन्दियाचें स्वागत मंडळ यांची काय कथा ? अखेर

सद्य:स्थितीनुरूप गोन्दियाला संमेलन भरवूं नये असा स्वागत मंडळाने निर्णय घेतला. त्याला विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाने ता. १२-२-४८ च्या सभेंत मान्यताहि दिली. आता १९४७ चें म्हणून गोन्दियाला होणारें विदर्भ साहित्य संमेलन स्थगित झालें असून, डिसेंबर १९४८ मध्ये योग्य ठिकाणीं विदर्भ साहित्य संमेलनाचें अकरावें अधिवेशन भरेल.

संघाच्या साधारण सभा

अहवालवर्षी विदर्भ साहित्य संघाच्या २६-१२-४६ व २२-२-४८ या तारखांना दोन साधारण सभा झाल्या. या साधारण सभांत अहवाल, जमाखर्च मंजुरी, 'युगवाणी' ची नवीन व्यवस्था, घटना दुरुस्ती, आणि वि. सा. संमेलनाचें प्रथम पुढे ढकललें गेलेलें व पुढे स्थगित झालेलें ११ वें अधिवेशन व त्यामुळे निर्माण झालेले कांही प्रश्न, निवडणुकी इत्यादि अनेक विषयांवर महत्वाचे निर्णय घेण्यांत आले.

विदर्भ साहित्य संघाच्या वाङ्‌मयविषयक परीक्षा

विदर्भ साहित्य संघाने अहवालवर्षी एका भरीव कार्याला सुरवात केली, इतकेंच नव्हे तर या एका वर्षात त्या क्षेत्रांत उल्लेखनीय यशहि संपादन केलें. ता. १८-८-४६ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेंत मराठी वाङ्मयाच्या अभ्यासाचा प्रसार होण्यासाठीं म्हणून विदर्भ साहित्य संघाने वाङ्मयविषयक परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. ही जबाबदारी संघाने माजी संघाध्यक्ष प्रा. श्री. ना. बनहट्टी यांजकडे सोपविली आणि प्रांतांतील विद्वानांची एक स्वतंत्र 'परीक्षा समिति' या कार्यासाठी नेमली. या 'परीक्षा समिती' ने या परीक्षांची योजना आखून, अभ्यासक्रमहि निश्चित केला. या समितीतर्फे अहवालवर्षी दोनदा परीक्षा घेण्यांत आल्या. दिवसेंदिवस परीक्षांना बसणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढत आहे. या 'परीक्षा समिती' चा स्वतंत्र अहवाल लवकरच प्रसिद्ध होईल.

वि. सा. साहित्य संघाला सरकारी देणगी

विदर्भ साहित्य संघाला मध्यप्रांत–वऱ्हाड सरकारने रु. १००० ची देणगी अहवालवर्षी मंजूर केली याबद्दल वि. सा. संघाला समाधान होणें साहजिक आहे. विदर्भ साहित्य संघाने पुनरुज्जीवनानंतर महाविदर्भांत मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृध्दीसाठी जें भरीव कार्य केलें, त्याला देणगीच्या रूपानें प्रांतीय सरकारने मान्यताच दिली आहे. विदर्भ साहित्य संघ प्रांतीय सरकारचा खरोखरच ऋणी आहे. यापुढेहि वि. सा. संघावर प्रांतीय सरकारची अशीच कृपादृष्टि राहील असा भरवसा आहे.

विदर्भ साहित्य संघाचा १९४७ चा जमाखर्च न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक रा. श्री. नी. देशपांडे यांनी गेल्या वर्षाप्रमाणे या वर्षीहि तपासला. हिशेबतपासनीस म्हणून वि. सा. संघाला रा. श्री. नी. देशपांडे यांचें जें निरपेक्ष सहकार्य मिळत आहे, त्याबद्दल वि. सा. संघ त्यांचा आभारी आहे. हिशेबतपासनीस रा. श्री. नी. देशपांडे यांच्या शेऱ्यासह १९४७ चा संघाच्या जमाखर्चाचा तक्ता या अहवालासोबत प्रसिध्द करीत आहों.

वि. सा. संघाच्या ता. ७-३-४८ रोजी अमरावती येथे भरलेल्या का. मं. च्या सभेने व साधारण सभेने प्रस्तुत अहवालाला मंजुरी दिली आहे.

अमरावती.
ता. २०-१०-४८

ना. कृ. दिवाणजी
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

दि. १-१-१९४७ ते ३१-१२-१९४७ पर्यंतचा जमाखर्चाचा तक्ता

जमा	रु. आ. पै	खर्च रु. आ. पै	
सालगुदस्त शिल्लक	६५९-१४- ०	४४७- ०- ०	'युगवाणी'च्या सभासद वर्गणीदारांची वर्गणी रा. ठाकूर यांस दिली.
वर्गणी-सभासद(वर्ग १)	५८५- ०- ०		
वर्गणी-सभासदवर्ग २	२५२- ०- ०	१७-१२- ०	छपाई
वर्गणी-हितचिंतक व		१८६-११- ६	ऑफिस व स्टेशनरी खर्च
तहहयात सभासद	९९- ०- ०	४२- १- ३	टपाल खर्च
बँकेकडून व्याज	१२- ५- ९	२१-१४- ०	प्रवास व प्रचार खर्च
किरकोळ	३५-१२- ०	२६- ०- ०	शाखा सभाखर्च
		२३४- ०- ०	अनामत (प्रचारकांकडून १९४७ ची १९४८ मध्ये वसूल झालेली वर्गणी प्रचारकांच्या नांवें)
एकूण जमा	१६४१-१५-९		
		११- ०- ०	किरकोळ
		०-१२- ०	बँक कमीशन
		९८७- २- ९	एकूण खर्च
		६५६-१३- ०	शिल्लक
		१६४३-१५- ९	

हिशेब तपासनिसांचा शेरा:—विदर्भ साहित्य संघाचे सन १९४७ चे जमाखर्चाचे हिशेब मीं तपासले. ते बरोबर आहेत.

ना. कृ. दिवाणजी
सरचिटणीस
वि. सा. संघ, अमरावती

(सही) श्री. नी. देशपांडे
हिशेबतपासनीस.

संपादकीय

लेखनाची तारीख १५ ऑक्टोबर १९४८

रौप्यमहोत्सव-अंक

विदर्भ-साहित्य-संघाच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने 'युगवाणी'चा प्रस्तुत अंक 'रौप्यमहोत्सव अंक' म्हणून प्रसिद्ध होत आहे. या अंकांत रौप्यमहोत्सवाच्या दृष्टीने कांही मजकूर आला आहे, त्याचप्रमाणे, सर्वसाधारण स्वरूपाचा असाहि मजकूर आलेला आहे. या अंकासाठी वाचनीय लिखाण पाठवून सहकार्य केल्या-बद्दल मी सर्व लेखक-बंधु-भगिनींचा अतिशय आभारी आहे.

महंत दत्तराज यांचें निधन

माहूर येथील देवदेवेश्वर संस्थानचे वयोवृद्ध महंत दत्तराज महानुभाव यांना कांही महिन्यांपूर्वी देवाज्ञा झाल्याचें वृत्त मला नुकतेच कळलें. तें ऐकून मला अत्यंत वाईट वाटलें! महंत दत्तराज हे मूळचे पंजाबी असूनहि महानुभाव वाङ्मयाचा त्यांचा दांडगा व्यासंग होता. पंथीयेतरांस महानुभाव वाङ्मय दाखविणारे व तें प्रसिद्ध करण्यास प्रोत्साहन देणारे ते त्या पंथाचे पहिलेच महंत होत. या दृष्टीने त्यांचें नांव महानुभाव वाङ्मयाच्याच केवळ नव्हे, तर मराठी वाङ्मयाच्याहि इतिहासांत कायमचें राहणार आहे. महंत दत्तराज यांच्या या कृपेचा लाभ खुद्द मलाहि झाला आहे. १९२८ मध्ये माहुरास त्यांचा पाहुणा म्हणून त्यांच्या मठांत कांही दिवस राहण्याचा सुयोग मला प्राप्त झाला होता. महंत दत्तराज यांचा कै. डॉ. रामकृष्णपंत भांडारकर, लोकमान्य टिळक, कै. वि. ल. भावे-प्रभृति विद्वानांशीं बराच संबंध आलेला होता. दत्तराज हे मार्मिक निरीक्षक व कांहीसे विनोदप्रिय असल्यामुळे भांडारकर-टिळकादिकांच्या कांही बारीकसारीक गोष्टी ते फार खुलवून सांगत असत!—असा व्यासंगी व चतुरस्र महंत दिवंगत झाल्यामुळे त्यांची माहिती असणाऱ्या सर्वांसच खेद वाटेल, यांत शंका नाही.

●


अनुक्रमणिका

कै. न. चिं. केळकर



यवतमाळ येथील तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष
(१९२५)

डॉ. य. खु. देशपांडे
अकोट येथील आठव्या अधिवेशनाचे अध्यक्ष
१९४५



(यूरोपांतील प्रवासाच्यावेळी)

अनुक्रमणिका

" युगवाणी " (Yugawani) Reg !. No. 945

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104|Genl I A अन्वयें 'युगवाणी' मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९।४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.